# श्रीमद्भगवद्गीता सार।।

आपल्या परमकल्याणाकरिता सदैव जप करा:

महामंत्र-

हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।

हरे राम हरे राम राम राम हरे हरे।।

श्रील गुरुदेवांचे प्राणधन श्री श्रीराधारमण विहारीजी आपले तिरके कटाक्ष आणि मंदमनोहर हास्य घेऊन श्रीरमणविहारी गौड़ीयमठ, ब्लॉक बी 3A, संगीतमय कारंजी- पार्क जवळ, जनकपुरी, नवी दिल्ली, येथे विहारित होऊन आपली अहैतुकी कृपावर्षण करण्याकरिता उद्यत आहेत.

आपण यावे आणि आमच्या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा.

दैनिक कार्यक्रम:- प्रातः मंगल आरती:- 4.30 (ग्रीष्मकाल); 5.00 (शीतकाल)

संध्या आरती- प्रवचन:- 7.00 ते 8.30 पर्यंत

साप्ताहिक कार्यक्रम (प्रत्येक रविवारी) :- भजन, कीर्तन, प्रवचन, प्रसाद, 11.30 ते 2.00 वाजेपर्यंत

जिज्ञासा तथा प्रश्नांच्या समाधाकरिता संपर्क:- श्री रामचंद्र दास

दूरभाष:- 9810192540

## ।।श्रीगुरु- गौरांगौ- जयतः।।

# श्रीमद्भगवद्गीता सार

श्री गौडीय वेदांत समिती एवं तदंतर्गत भारतव्यापींचे
श्रीगौडीय मठांचे प्रतिष्ठाता श्रीकृष्णचैतन्यन्माय
दशमाधस्तनवर श्रीगौडीयाचार्यकेशरी
नित्यलीलाप्रविष्ट
ॐ विष्णुपाद अष्टोत्तरशत
श्री श्रीमद्भक्तिप्रज्ञान केशव गोस्वामी महाराजजींचे अनुगृहित
त्रिदण्डिस्वामी
श्रीश्रीमद्भक्तिवेदांत नारायण गोस्वामी महाराजजी
यांच्याद्वारा श्रीमुखनिःसृत अमृतमयवाणीद्वारा संकलित

## प्रकाशकीय वक्तव्य

'श्रीमद्भगवद्गीता सार' नामक या ग्रंथाला माझ्या प्रिय वाचकांसमोर प्रस्तुत करतांना मला अपार हर्ष होत आहे. हा ग्रंथाला माझ्या प्रिय वाचकांसमोर प्रस्तुत करतांना मला अपार हर्ष होत आहे. हा ग्रंथ परमआराध्यतम गुरुदेव ॐ विष्णुपाद परमहंस परिव्राजकाचार्य अष्टोत्तरशत श्रीश्रीमद्भक्तिवेदांत नारायण गोस्वामी महाराजजीद्वारा श्रीश्रीमद्भक्तिवेदांत नारायण गोस्वामी महाराजजींद्वारा श्रीश्रीमद्भगवद्गीतेवर दिलेल्य प्रवचनांवर आधारित आहे. श्रील गुरुदेवांनी शुद्धभक्ती मार्गप्रदर्शक रुप बंगला तथा संस्कृत भाषेतल्या अनेकानेक ग्रंथांचे हिंदी भाषेत अनुवाद आणि टीका प्रकाशित केलेल्या आहेत. अधिकांश ग्रंथ आकाराने मोठे तथा विषयाने अत्यंत गंभीर असल्याने सामान्य जनांना या ग्रंथांना ग्रहण करणे सहज शक्य नाही. सामान्य जनांवर कृपा करण्याकरिता श्रील गुरुदेवांनी आपल्य विभिन्न विषयांवर दिलेल्या प्रवचनांना आधार बनवून छोट्या आकाराचे सुलभ ग्रंथ प्रकाशित करण्याची अनुमती प्रदान केली आहे. या श्रृंखलेतील 'श्रीमद्भगवद्गीतासार' प्रथम ग्रंथ आहे. गीतेचे मर्म सर्वसाधारण जनतेला सरळ आणि सहजसोप्या रुपात

बोधगम्य बनविण्याकरिता हा ग्रंथ प्रकाशित करण्याची आवश्यकता अनुभवली गेली. श्रील गुरुदेवांच्या चरणसरोजी विनम्र निवेदन आहे की त्यांनी या दीन-हीनावर आपली अहैतुकी कृपा वर्षित करावी जेणेकरुन अधिकाधिक ग्रंथांचे प्रकाशन संभव होऊ शकेल.

मुद्रणकार्यातील शीघ्रतेमुळे ग्रंथात जर काही त्रुटी-विच्युति निदर्शनास आल्या तर सज्जन वाचकांनी निजगुणांनी क्षमा करावी आणि संशोधन करुन ग्रंथांचे सार ग्रहण करावे.

श्रीश्रीगुरुकृपलेश- प्रार्थी
दीन-हीन
गोकुलचंद्र दास

# प्रस्तावना

श्रीमद्भगवद्गीतेला गीतोपनिषद् म्हटलं गेलंय. हे समग्र वैदिक ज्ञानाचे सार आहे, तसेच वैदिक साहित्यातील महत्वपूर्ण उपनिषद् आहे. जे लोक साधू-गुरु- वैष्णवांचे चरणाश्रय श्रद्धापूर्वक ग्रहण करुन या ग्रंथाचे अनुशीलन करतील, ते विनसायास यथार्थ तात्पर्य ग्रहण करतील तसेच ते सहज-सरळ रुपाने भवसागर पार करुन श्रीकृष्णांच्या चरणकमळांची पराभक्ती प्राप्त करुन कृष्णप्रेमाचे अधिकारी बनतील यात शंकाच नाही.

आजकाल भारतातील मोठे-मोठे मनिषिगण तसेच प्रवीण व्यक्ति या ग्रंथाचा आदर करतांना दिसतात. इतकेच काय की सर्वसंप्रदायातील लोक या ग्रंथराजाप्रती आदर आणि श्रद्धाभाव ठेवतात. खूपशा

प्रसिद्ध राजनैतिक व्यक्तिंनी या ग्रंथाप्रति श्रद्धा प्रकाशित केली आहे. जगातल्या सगळ्या देशांतील मनिषींनीसुद्धा या ग्रंथाची भरपूर प्रशंसा केली आहे.

श्रीगीताशास्त्राच्या वाचकांना दोन भागांत विभक्त केले जाऊ शकते, स्थूलदर्शी आणि सूक्ष्मदर्शी. स्थूलदर्शी पाठक केवळ वाक्यांचे बाह्यार्थ ग्रहण करुन सिद्धांत निर्माण करतात. परंतु सूक्ष्मदर्शी पाठकगण शास्त्राच्या बाह्यार्थाने संतुष्ट न होता गंभीर तात्विक अर्थाचे अनुसंधान करतात. स्थूलदर्शी वाचकग आदिपासून अंतापर्यंत गीतेचे पठण करुन हा सिद्धांत ग्रहण करतात की कर्मच गीतेचा प्रतिपाद्य विषय आहे, कारण अर्जुनाने संपूर्ण गीता ऐकून शेवटी युद्ध करणेच श्रेयस्कर समजले.

सूक्ष्मदर्शी वाचकगण तसे स्थूल सिद्धांतांनी संतुष्ट नसतात. ते एकतर ब्रह्मज्ञानाला अथवा पराभक्तिलाच गीतेचे तात्पर्य मानतात. त्यांचे म्हणणे असे की अर्जुनाचे युद्ध अंगिकारणे हे अधिकारनिष्ठेचे उदाहरण मात्र आहे, ते गीतेचे चरम तात्पर्य नाही.

श्रीमद्भगवद्गीतेचे तात्पर्य अर्थात् तिच्या चरम प्रतिपाद्य विषयाला समजण्याकरिता तिच्या वक्तव्याद्वारे दिलेल्य निर्देशांना ग्रहण करायला हवे. गीतेचे वक्ता स्वयं भगवान् श्रीकृष्ण आहेत. गीतेच्या प्रत्येक पृष्ठात त्याचा उल्लेख भगवान् या स्वरुपात आलाय. श्रीकृष्णाने स्वयं अहैतुकी कृपावशतः खुपशा स्थळी स्वतःला परत्वर तत्व भगवान् संबोधले आहे-

‘अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्व प्रवर्त्तते।
इति मत्व भजंते मां बुधा भावसमन्विताः।।’ (गीता १०/८)
‘मत्तः परतरं नान्यत् किंचिदस्ति धनंजय।
मयि सर्वमिदं प्रातं सुत्रे मणिगणा इव।।’ (गीता ७/७)
‘अहं हि सर्वयज्ञांना भोक्ता च प्रभुरेवच।
न तु मामभिजानंतितत्वेनात च्यवंति ते।।’ (गीता ९/२४)

अन्यान्य भगवदअवतारांनी आपल्या भगवत्तेचा परिचय स्पष्टरुपाने स्वतः दिला नाही. परंतु गीतेत भगवान् श्रीकृष्ण स्वतःच सुस्पष्ट रुपाने आपल्या भगवत्तेचे परिचय देऊन आपली शरणागती आणि भक्ती हीच जीवांकरिता सर्वोत्तम साधन असल्याचे निर्दिष्ट करतात. भक्ति हाच गीतेचा चरम प्रतिपाद्य विषय आहे. आणि याला स्वयं श्रीकृष्णानेच प्रतिपादित केले आहे.

भगवान् श्रीकृष्णाने परतत्व निर्णयासंबंधात ब्रह्मज्ञानाला गुघ्य, परमात्मज्ञानाला गुह्यतर आणि पराभक्तिला सर्वगुह्यतम सांगितले आहे. हेच गीताशास्त्राचे यथार्थ समन्वय आहे.

ग्रंथाच्या अनुवाद तथा प्रूफ संशोधनाच्या कामी कन्या जानकी दासी, कंप्यूटरवर कंपोजिंग तथा आऊटलेट करिता श्रीमान् गोकुलचंद्रदास, प्रूफ संशोधनाकरिता श्रीओमप्रकाश ब्रजवासी तसेच संपादन कामाकरिता श्री भक्तिवेदांत माधव महाराज यांची सेवाचेष्टा प्रशंसनीय आहे. ग्रंथाकरिता चित्रे प्रस्तुतकरण्याकरिता श्रीयुत श्यामारानीदासी यांची सेवाचेष्टा प्रशंसनीय आहे. विशेषतः ग्रंथ प्रकाशनाच्या संपूर्ण आर्थिक सेवानुकुल्याकरिता श्रीमान् संजय जैन आंतरिक धन्यवादाचे पात्र आहेत. श्रीश्रीगुरु-गौरांग-गांधर्विका गरिधारी या सर्वांवर प्रचूर कृपशिर्वाद करोत.

अंततः भगवत् करुणेचे घनविग्रह परमआराध्यतम श्रीगुरुपादपद्म नित्यलीला प्रविष्ट ॐ विष्णुपाद अष्टोत्तरशत श्रीश्रीमद्भक्तिप्रज्ञान केशव गोस्वामी महाराज माझ्या प्रति प्रचूर कृपाशिर्वाद वर्षण करोत, जेणेकरुन मी दीन-हीन सेवक त्यांच्या मनोभिष्ट सेवेत अधिकाधिक अधिकार प्राप्त करु शकेल, हीच त्यांच्या चरणी सकातर प्रार्थना आहे.

श्री गिरीधारी गौडीयमठ<br>
गोवर्धन, जिल्हा मथुरा (उ.प्र.)<br>
अन्नकूट महोत्सव<br>
२ नोव्हेंबर २००५.

श्रीहरिगुरु वैष्ण कृपालेशप्रार्थी<br>
दीन-हीन<br>
त्रिदण्डीभिक्षु<br>
श्रीभक्तिवेदांत नारायण

# प्रथम परिच्छेद

शास्त्रांमध्ये अनेक धामांचे वर्णन आहे, परंतु समग्र ब्रह्मांडात वृंदावनसारखे दुसरे धाम नाही. वृंदावनाच्या महिमेस केवळ वृंदावनाची कृपा प्राप्त व्यक्तिच समजू शकते. श्रीकृष्ण आपल्या नित्य परिकरांसोबत येथे दिव्य लीला विलासादि करतात. भक्ताच्या जीवनाची चरमसिद्धी हीच आहे की श्रीकृष्णच्य लीलांचे सदा स्मरण रहावे तथा श्रीराधाकृष्ण युगल आणि त्यांचे नित्य परिकरांची प्रेम सेवा परिपाटीच्या भावनेत मन आणि हृदय पूर्णतया आविष्ट होऊन जावे.

हे भाव तथा लीला- विलासादि श्रीमद्भागवतात विशद रुपाने वर्णित केले गेले आहे जे सर्वोपरि चिन्मय (दिव्य) शास्त्र आहे. या सर्व प्रसंगांना समजण्याकरिता श्रीमद्भवद्गीतेची उपदेशावली पाया प्रस्तुत करते. याच पायावर श्रीमद्भगवतरुपी द्वादशमाळे (स्कंध) असलेला प्रासाद निर्मित आहे. नऊ माळे वा स्कंध खाली आहेत आणि दोन माळे वर आहेत, मध्यभागी आहे दहावा माळा अथवा दशम स्कंध. या दहाव्या स्कंधात नव्वद कुंज आहेत, जे अध्याय समूह आहेत. या कुंजाच्या केंद्रस्थानी शसपंचाध्यायीरुपी पाच विशेष प्रकोष्ठ आहेत. जेथे श्रीराधाकृष्णयुगुल विलासरत आहेत. असे वाटते की ते श्रीमती राधिका आणि श्रीकृष्णाची सेवा करित आहेत. परंतु वास्तविक रुपात श्रीकृष्ण त्यांची सेवा करित आहेत. जोपर्यंत श्रीमद्भवद्गीतेच्या उपदेशांचा पाया आपल्य हृदयात स्थापित होत नाही तोपर्यंत आपण या दिव्य लीलांसंबंधीची जड धारणा करुन घेतो, जी आपल्या सर्वनाशाकरिता कारणीभूत ठरते. गीतेत (१८/६५) आपण पाहतो-

मन्मनाभव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।  
मामैवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे।।

“आपल्या मनाला आणि हृदयाला माझ्यात आविष्ट करा, माझे भक्त बना, माझी पूजा करा, मला प्रणाम करा, अशा प्रकारे निश्चितरुपाने तुम्ही मला

प्राप्त करु शकता. मी तुझ्या निकट ही प्रतिज्ञा करतो, कारण तू (अर्जुन) माझा सर्वाधिक प्रिय आहेस.”

हाच भगवद्गीतेचा सर्वश्रेष्ठ श्लोक आहे. हा श्लोक आपल्या परवर्ती श्लोकाच्याहीपेक्षा (१८/६६) उत्तम आहे ज्यात श्रीकृष्ण वदतात-

सर्व-धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वां सर्व-पापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः।।

“समस्त प्रकारचे जागतिक धर्म, शारीरिक वा मानसिक, वर्णाश्रम-धर्म, अन्य देवदेवातांची पूजा देखिल त्यागून केवळ माझ्या शरणागत हो, भय वाटून देऊ नकोस कारण मी तुझ्या समस्त पापांना नष्ट करुन टाकीन.” परंतु “मन्मनाभव” श्लोक याहीपेक्षा अधिक महत्वपूर्ण आहे. ‘सर्वधर्मान् परित्यज्य’ श्लोक शरणागतीचा उपदेश देतो, तर ‘मन्मना भव’ श्लोक त्याच शरणागतीचे फळ ‘प्रेमभक्ती’ प्रदान करते, ज्यामुळे या श्लोकाची महिमा अधिक आहे. जेंव्हा आपण गीतेचे अध्ययन करतो, विशेषतः जेंव्हा आपण आचार्यांची टीका पाहतो, तेंव्हा त्यात गीतेचे पाच प्रकारचे उपदेश प्राप्त होतात.

१. सर्वांकरिता साधारण उपदेश
२. गुह्य (गूढ)
३. गुह्यतर (अधिक गूढ)
४. गुह्यतम
५. सर्व-गुह्यतम (सर्व गुढांत देखिल अत्याधिक गूढ)

हे उपदेश विस्तृत रुपांत नाही दिले गेलेत, अपितु सूत्ररुपांत आहे.

## साधारण उपदेश

साधारण व्यक्तिंकरता भगवान श्रीकृष्ण म्हणतात-

युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु।
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा।। (गीता६/१७)

अधिक आहार करु नये तथा अधिक झोपू नये. जगातील कार्य आणि इंद्रियतृत्पीवर नियंत्रण ठेवावे, अन्यथा तू त्या दुर्लभ योगास प्राप्त करु शकत नाही, ज्यांत एक आत्मा आपल्या सृष्टीकर्त्यासमवेत युक्त असते. आहारविहारात संयम न ठेवल्याने नाना प्रकारच्या व्याधी उत्पन्न होतात. त्यामुळे साधनेत विघ्न पडते. त्याचप्रमाणे विविध चिंतांनी उद्विग्न चंचल मनाने देखिल साधनसिद्धी होऊ शकत नाही. साधारण रुपात श्रीकृष्णाने हे ज्ञान प्रदान केले की आपण हे शरीर नाही. शारीरिक कामनांपासून पृथक् रहा, त्यांच्या तृत्पिकरता प्रयत्नशील राहू नका.

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुव जन्म मृतस्यच। (गीता २/२७)

ज्याने जन्मग्रहण केलाय, त्याचा मृत्यू अटळ आहे. तथा परवर्ती अवस्थेत त्याचा पुनर्जन्म निश्चित आहे. अर्जुन सर्वांकरिता शोक करित आहे- पुत्राकरिता, पत्नीकरिता, आप्तस्वकीयांकरिता, बंधुबांधवांकरिता, आपणही या सर्वांकरिता शोक करित असतो.

अशोच्यानानुशोचतस्वां प्रज्ञावादांश्च भाषसे।
गतासूनगतासूंश्च नानुशोचंति पंडितः।। (गीता २/२७)

विज्ञव्यक्ति जीवित अथवा मृत व्यक्तिंकरिता शोक करित नाही. सगळ्यांनाच देहत्याग करावा लागतो. जे आज नाही गेलेत, त्यांना उद्या वा परवा जावेच लागते, त्यांच्याकरिता दुःख करु नये. शरिरातील अजर, अमर, आत्म्यास नित्य जाणून स्थूल शरिराच्या विनाशाने विचलित होऊ नका.

नैनं छिंदंति शस्त्राणि नैनं दहति पावकः।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः।। (गीता २/२३)

आत्म्यास कुठल्याही शस्त्राद्वारे छेदन करता येत नाही, अग्निद्वारे जाळता येत नाही, पाण्याद्वारे आर्द्र वा पवनाद्वारे शुष्क करता येत नाही. आत्मा नित्य आहे, किंतु शरीराचा मृत्यू अवश्य आहे. म्हणून शरिराची अधिक चिंता करु नका.

हो, एक व्यक्ति या संदर्भात असा विचार करु शकते- भगवंताने या शरीररुपी मंदिराला त्याचे भजन करण्याकरिता प्रदान केले आहे, असा अनुभव केल्यानंतर ती व्यक्ती शरीर रक्षणाकरिता यत्न करु शकतो. आपल्याला या शरीराला स्वच्छ ठेवायला हवे, आवश्यकतेनुसार चिकित्सा आदी करायला हवी, अन्यथा आपण भजन करु शकत नाही. या उद्देशाने शरिराकरिता यत्न करणे ठीक आहे परंतु हे सर्व वैराग्यपूर्ण भावनेने करायला हवे. अंततः भगवंत यांस परत मागणार आणि त्यावेळीसच आपण ते परत करणे अनिवार्य आहे. भगवंत विचारतील- “मी तुला हा दुर्लभ मूल्यवान मानव शरीर दिले आहे, तु त्याचा कसा काय उपयोग करुन घेतलास?” म्हणून त्यांनी अशा प्रकारचे श्लोक म्हटले आहे-

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्त्ति संयमी।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः।। (गीता २/६९)

जेंव्हा साधारण लोक झोपलेले असतात तेंव्हा साधू आत्मानुभूतीमध्ये जागृत रहातात तसेच जेंव्हा साधू निद्रित असतात तेंव्हा साधारण लोक आपल्या इंद्रिय तृत्पिमध्ये जागृत रहातात. म्हणून तु सरलतापूर्वक भगवद् भजनात निमग्न रहा आणि सुख-दुःखाला समसमान मानून आपले कर्तव्य कर्म करित रहा.

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन। (गीता २/४७)

आपले कर्म करित जा तथा आपल्या श्रमाच्या फळाची इच्छा धरु नकोस. येथपर्यंत हा साधारण उपदेश आहे.

## गुह्यं (गूढं) उपदेश

यानंतर गुह्य (गूढ) उपदेश येतो, ज्याला ब्रह्मज्ञान म्हणतात. आत्मा चिद्ववस्तू आहे तथा परब्रह्माचा अंश आहे.

स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव।

स्तितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत कीम्।। (गीता २/५४)

अर्जुन पृच्छा करतो- “हे केशव! समाधिमध्ये स्थित असणाऱ्या स्थिरबुद्धी व्यक्तिंची काय लक्षणे आहेत? त्या कशाप्रकारे बोलतात, कशाप्रकारे बसतात आणि कशाप्रकारे चालतात?”

अष्टादश अध्यायात हा सिद्धांत आहे की-

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति।
समःसर्वेषु भूतेषु सद्भक्तिं लभते पराम्।। (गीता १८/५४)

ब्रह्म अवस्थित प्रसन्नचित्त व्यक्ति न शोक करतात न ही आकांक्षा करतात. ते सर्व भूतांमध्ये समदर्शी होऊन प्रेमलक्षणयुक्त माझी भक्ती प्राप्त करतात.

ब्रह्मभूत शब्दाचे तात्पर्य जीवाचे आपल्या स्वरुपगत नित्य स्थितीत प्रतिष्ठित होणे आहे. ब्रह्मभूत अवस्था प्राप्त जीवांची लक्षणे येथे दिली आहेत-

(क) प्रसन्नात्मा- प्राकृत गुणमय सूक्ष्म शरीर दूर झाल्यामुळे सदा-सर्वदा प्रसन्न रहाणे हे प्रथम लक्षण आहे.

(ख) न शोचति - नष्ट झालेल्या विषयांकरिता त्यांना कधीच शोक रहात नाही.

(ग) न कांक्षति- भगवत् प्रीतिच्या कामने अतिरिक्त कुठल्याही सांसारिक विषयांची आकांक्षा न करणे अर्थात् दैहिक अभिमान राहिल्याने विषयभोगाची लालसाही लोप पावते.

(घ) समःसर्वेषुभूतेषु- भद्र-अभद्र समस्त प्राण्यांप्रती बालकाप्रमाणे समदर्शी असणे.

(ङ) मद्भक्ति पराम्- माझ्या पराभक्तिची अभिलाषा असणारे.

ही त्यांची लक्षणे आहेत. अशी लक्षणेयुक्त ब्रह्मभूत महात्मा, साधुसंगत भगवंताची परा-प्रेमाभक्ती प्राप्त करतात.

द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च।

क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थेऽक्षरउच्यते।।(गीता १५/१६)

क्षर आणि अक्षर- ही दोन पुरुष तत्वे आहेत. यातील आपल्या स्वरुपातून विच्युत होणारा क्षर जीव आहे तथा जो आपल्या स्वरुपातून कधीच विच्युत होऊ शकत नाही, तो स्वांश तत्वच 'अक्षर पुरुष' आहे. अक्षर पुरुषाचे दुसरे नाव कूटस्थ पुरुष देखील आहे. जो एकरुपाने सर्वकालव्यापी आहे, तोच कूटस्थ आहे.

त्या कूटस्थ अक्षर पुरुषाचे तीन प्रकाश आहेत- ब्रह्म, परमात्मा तथा भगवान! जगत् सृष्टी झाल्यानंतर जगतात सर्वव्यापी सत्तास्वरुपात तसेच जगतातल्या समस्त धर्मांच्या विपरित अवस्थेत जे अक्षर पुरुष लक्षित होतात, तेच ज्ञानीजनांचे उपास्य ब्रह्म आहे. म्हणूनच ब्रह्म जगत्संबंधी तत्व विशेष आहे, स्वतंत्र तत्व नाही. साधारण रुपात हेच ब्रह्मज्ञान होय.

## गुह्यतर (अधिक गूढ) उपदेश

यानंतर येते गुह्यतर (अधिक गूढ), जे परमात्म-ज्ञान आहे.

उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः।
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः।। (गीता १५/१७)

परंतु पूर्वोक्त क्षर आणि अक्षर तत्वाने भिन्न एक अन्य उत्तम पुरुष परमात्मा म्हणवला जातो. जो ईश्वर आणि निर्विकार आहे तथा तिन्ही लोकांमध्ये प्रविष्ट होऊन त्याचे पालन करतो.

ज्ञानिजनांचे उपास्य असणाऱ्या 'ब्रह्म' तत्वाविषयी सांगितल्यानंतर 'उत्तमः' इत्यादी द्वारे योगींचे उपास्य असणाऱ्या परमात्म्याविषयी श्रीकृष्ण सांगत आहेत. 'तु' शब्द पहिल्यापेक्षा विशेष असण्याचे द्योतक आहे. गीता (६/४६) मध्ये म्हटलय- 'ज्ञानिभ्यश्चाधिको योगी' अर्थात् योगी ज्ञानीजनांपेक्षाही श्रेष्ठ

आहेत. या वाक्याने हेच जाणता येते की उपासकाचे वैशिष्ट्य असल्या कारणाने उपास्याचे देखील वैशिष्ट्य असते. परमात्मतत्व अशापकारे विशद केले आहे- जो ईश्वर अर्थात् नियामक आहे, 'अव्ययः' अर्थात् निर्विकार भावात समग त्रिलोकात प्रविष्ट होऊन त्यास धारण करतो आणि त्याचे पालन करतो, तोच परमात्मा होय.

'तृतीय एवं सर्वोत्कृष्ट अक्षर पुरुषाचे नाव' भगवान् आहे। श्रीकृष्ण तेच भगवत्-तत्त्व आहे. ते क्षर पुरुष 'जीव' याच्याही पलिकडले आणि अक्षर पुरुष 'ब्रह्म' आणि 'परमात्म्यापेक्षाही' उत्तम आहेत. म्हणूनच जगतात तथा वेदांमध्ये त्यांना पुरुषोत्तम म्हटलं गेलंय.

ब्रह्म, परमात्मा आणि भगवान यांच्या उपासकांकरिता त्यांच्या प्राप्तिचे साधन क्रमशः ज्ञान, योग, तथा भक्ति आहे. ज्ञान आणि योगाचे फल मोक्ष आहे परंतु भक्तिच्या सहाय्यतेशिवाय ज्ञान आणि योग यांद्वारे मोक्ष प्राप्त होत नाही. भगवंतांच्या उपासकांना आपल्या साध्यसिद्धीकरता ब्रह्म अथवा परमात्म्याची उपासना करावी लागत नाही.

क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम्।

(गीता १२/५)

निर्विशेष ब्रह्मस्वरुपात आसक्तचित्त व्यक्तिंनाअधिकतर क्लेश होतात कारण इंद्रियांचा विरोध करुनच अव्यक्त ब्रह्माविषयी जाणले जाऊ शकते. ज्याची गती व्यक्त होत नाही त्याला प्राप्त करणे अत्यंत कष्टप्रद असते. म्हणूनच निराकार ब्रह्माकडे जाण्याचा प्रयत्न करु नका. सावधान! कुण्या आकारहीनाचे ध्यान करण्यात अत्याधिक कष्ट आहेत. त्याबदल्यात परमात्म्याचे आपल्या हृदयात ध्यान करावे. परमात्मा प्रत्येक जीवाच्या हृदयात अंष्ठ आकारात निवासित आहे. त्याचे ध्यान करुन जर त्याच्या निकट पोहोचू शकत नाही तर पुनर्वार चेष्टा करा. हेच योगिजनांचे परमात्म-ज्ञान आहे. परंतु वास्तविक योगी तेच असतात जे चित्त आणि देहाला संयत करुन, विषयांचा अस्वीकार करुन योगाद्वारे परमात्मायुक्त होतात.

स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः। (गीता ६/१)
अग्निहोत्रादी कर्मांचा त्याग करणारा संन्यासी नाही आणि देहसंबंधी कर्मांचा परित्याग करणारा योगी नाही. हेच ज्ञान गुह्यतर आहे.

## गुह्यतम उपदेश

गुह्यतम उपदेश नवव्या अध्यायात दिला गेलाय. हे शुद्ध भक्तिच्या लक्षणांनी युक्त ज्ञान आहे जे गुह्यतम आहे. या गुह्यतम ज्ञानाद्वारेच या संसाररुप अशुभातून मुक्ति प्राप्त होते.
श्रीभगवानुवाच-

इदन्तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे।
ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात्।।(गीता ९/१)

श्री भगवान म्हणाले- हे अर्जुन! मी दोषयुक्त तुला विज्ञानयुक्त, केवळ शुद्धभक्ति- लक्षणांनी युक्त हे ज्ञान सांगेन, जे जाणून तु या दुःखमय संसारातून मुक्त होऊन जाशील.
या अध्यायात केवला भक्तिची सर्वश्रेष्ठता वर्णिली गेली आहे, ज्यात अंतःकरणाच्या शुद्धीची अपेक्षा नसते. अत्यंत दुराचारी अनर्थग्रस्त व्यक्तिंच्या ह्रदयातही भक्तिकृपापूर्वक प्रवेश कृपापूर्वक प्रवेश करुन त्याला परमपवित्र आणि विश्व वंदनीय सर्वश्रेष्ठ महाभागवत बनविते. गुह्यतम शुद्धाभक्ति संबंधी हे ज्ञान परम विज्ञानमय आहे. ईश्वर विषयक ज्ञानाला अनूभूतिसहित विशेष रुपात जाणणेच विज्ञान होय. येथे वर्णन शुद्धभक्तिवषयक आहे परंतु येथे भगवंतांच्या रसपूर्ण परिचर्येविषयी नाही सांगितले गेले आहे. यद्यपि ही शुद्धभक्ति आहे, तरीसुद्धा रसमय नाही.

## सर्वगुह्यतम उपदेश

अष्टादश अध्यायाच्या शेवटी सर्वगुह्यतम उपदेश प्रदत्त आहे.

सर्वगुह्यतमं भूयः श्रृणु मे परमं वचः।
इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम्।। (गीता १८/६४)

अति गंभीर अर्थाने परिपूर्ण असे गीताशास्त्र श्रवण करुन अर्जुन निस्तब्ध झाला, हे पाहून नवनीतासमान चित्त असणारे भगवान् श्रीकृष्णाचे हृदय द्रवीभूत झाले आणि ते म्हणाले- “हे प्रिय मित्र अर्जुन! आता जे मी सांगणार आहे ती वचने ‘परमम्’ आहेत, अर्थात् गीताशास्त्र जे सर्व शास्त्रांचे सार आहे, त्याचेदेखील सार आहे. ‘गुह्यतमम्’- या वचनांपेक्षा अधिक गुह्य आणखी काहीच नाही, कुठेच नाही आणि कुठे कशाप्रकारे असुही शकत नाही, हे अखंड आहे. या वचनांना पुन्हा सांगण्याचे कारण हे आहे की तु माझा अतिप्रिय सखा आहेस, म्हणून तुझ्या मंगलाकरिता मी हे सांगणार आहे. का नाही! कारण कुठलीही व्यक्ति आपल्या प्रिय सख्याव्यतिरिक्त अन्य कोणालाही अतिरहस्यपूर्ण गोष्ट सांगत नाही.”

“मी तुला ‘गुह्य ब्रह्म-ज्ञान’ आणि ‘गुह्यतर ईश्वर-ज्ञान’ या विषयी सांगितले. आता ‘गुह्यतम’ ‘भगवत्-ज्ञानाचा’ उपदेश देत आहे, श्रवण कर. या गीताशास्त्रात मी जितके उपदेश केले आहेत, त्या सर्वांपेक्षा हा उपदेश श्रेष्ठ आहे. तु माझा अत्यंत प्रिय आहेस, तेंव्हा तुझ्या हिताकरिता हे मी सांगत आहे.”

मन्मनाभव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।
मामेवैष्यसी सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे।। (गीता १८/६५)

तू मला तुझे चित्त समर्पण कर, माझे नाम-रुप-लीला आदिंचे श्रवण-कीर्त्तन परायण होऊन माझा भक्त हो, माझी पूजा करणारा हो आणि मला नमस्कार कर. अशा प्रकारे तू मलाच प्राप्त होशील. मी तुझ्याकडे ही सत्य प्रतिज्ञा करतो, कारण तू माझा प्रिय आहेस.

हाच भगवद्गीतेचा सर्वश्रेष्ठ श्लोक आहे. हा रसमय आहे तथा भक्तिची चरम सीमा आहे. येथे भगवान् सर्वगुह्यतम उपदेश करित आहेत. तो उपदेश काय आहे? या आधी, श्रीकृष्णाने नारायणाची पूजा

करण्यापर्यंतचे वर्णन केले होते, जी भगवंतांची ऐश्वर्यबुद्धीने केलेली पूजा आहे. परंतु या श्लोकात चार विशेष क्रियांचे वर्णन आहे. पहिले आहे- 'मन्मना भव', सर्वदा माझे चिंतन करा, दुसरे आहे- मां नमस्कुरु, मला प्रणाम करा.

जर तुम्ही पहिले नाही करु शकत तर दुसरे करा. जर तेही नाही करु शकत तर तिसरे करा. जर तेही जमत नसेल तर केवल प्रणाम करा, त्यानेच सर्व काही होऊ शकेल.

## द्वितीय परिच्छेद

या अध्यायात 'मन्मना भव'- 'आपले मन आणि हृदय माझ्यात आविष्ट करा'- याची आलोचना करु या। असे करणे सहज नाही. जर कुणी व्यक्ति कुण्या एका वस्तूत मन आविष्ट करु पहात असेल तर त्याचे नेत्र, कान आदि समस्त इंद्रिय केवळ त्याच वस्तूवर केंद्रित असायला हवीत. जर मन कुठल्या वस्तूवर केंद्रित नाही होऊ शकत तर ते अनियंत्रित मन आहे. आपले मन कधी विषयांमध्ये गुरफटते तर कधी कुणाविषयी चिंता करते. हीच आपली बद्ध अवस्था आहे. परंतु जर कुणाचे मन श्रीभगवंतांच्या चरणकमलांत पूर्ण निविष्ट रहाते, तर तीच सर्वोत्तम प्रकारची पूजा आहे. कुण्या साधकाकरिता असे केंव्हा शक्य असते? श्रद्धा रुपी प्रारंभिक अवस्थेत हे संभव नसते. क्रमशः रुचिची अवस्था आल्यानंतरही हे संभव नसते. रुचिच्या अवस्थेनंतर आपण यथार्थाने आपले हृदय भगवंताला देऊ लागतो. आसक्तिच्या अवस्थेत आपण आपल्या हृदयाचा अर्धा अंशच भगवंताला समर्पित करु शकतो, भाव अवस्थेत तीन-चतुर्थांश अंश समर्पित करु शकतो, परंतू प्रेम-अवस्था प्राप्त केल्यावरच आप आपले हृदय पूर्ण रुपाने श्रीकृष्णाला समर्पित करु शकतो.

जेंव्हा श्रीकृष्ण, उद्धवाला वृंदावनात गोपिंकडे पाठवत होते, त्यावेळेस त्यांनी अत्यंत चतुरतापूर्वक आणि वाक्य-भंगी द्वारा म्हटले,

"हे उद्धवा! माझे माता-पिता माझ्या विरहात फार दुःखी आहेत. तू वृंदावनात जाऊन माझ्या संदेशाद्वारे त्यांना सांत्वना देऊन ये."
हे ऐकून उद्धव श्रीकृष्णाजवळ काही क्षण थांबले आणि मग म्हणाले- "या अतिरिक्त आणखी काही कार्य आहे काय?"
श्रीकृष्णाने विचार केला, "यांना काय सांगू आणि काय न सांगू?" ते थोडे चिंतित झाले. थोड्या वेळाने विचार करुन त्यांनी निर्णय घेतला, "जर मी यांना आत्ता नाही सांगितले तर मग कधी सांगणार?"
श्रीकृष्ण वदले, "हो, एक कार्य आणखी आहे. त्या वृंदावनात गोपी आहेत ज्या माझ्या प्रियतमा आहेत. त्यांनी आपले संपूर्ण हृदय मला समर्पित केले आहे, तथा माझ्याशिवाय त्या कुणालाच जाणत नाही. माझ्याकरिता त्यांनी आपल्या समस्त दैहिक क्रिया आणि दैहिक आवश्यकता त्यागल्या आहेत. जी व्यक्ति आपल्या समस्त दैहिक आवश्यकता विसरुन गेलीय तिची दशा कशी असेल बरे? त्या खाणे-पिणे, स्नान आदिकृत्ये, वस्त्र आणि अलंकारांनी स्वतःला सजविणे तथा आपल्या केसांना सावरणे विसरुन गेल्यात. त्यांचे देह खूप क्षीण झालेत आणि तू बघ की कशाप्रकारे त्यांनी माझ्याकरिता समस्त बंधू-बांधव, गृह-धन आदिंचा परित्याग केला आहे. त्या केवळ माझ्यावरच प्रेम करतात तथा दिवस-रात्र माझ्या तीव्र स्मरणात निमग्न असतात. उद्धवा!या जगात आपल्या हृदयाला अशा प्रकारे दुसऱ्याला देण्याचे उदाहरण तू पाहिलेच नसशील. कसतरी त्यांनी आपल्या प्राणाला धारण केले आहे. त्यांचा प्राणवायू त्यांच्या कंठाशी आला आहे, तेंव्हा अशा अवस्थेत त्या किती वेळ जिवंत राहू शकतील? मला माहित नाही त्या जिवंत राहू शकतील अथवा नाही. म्हणून शीघ्र वृंदावनी जा आणि त्यांच्या प्राणांची रक्षा कर. तेथे जाऊन त्यांना माझा संदेश दे की मी निश्चितच उद्या किंवा परवा परत येईन. माझ्या प्रतिक्षेत त्यांनी प्राण धारण केलेले आहेत. त्या विचार करित असतील, " कृष्णाने सांगितले की ते येणार आहेत, ते

खोटे नाही बोलू शकत." याच आशेवर त्यांचे प्राण जणू शाखेवर टांगलेले आहेत, ती तुटल्यावर त्यांचे प्राण निघून जातील, तेंव्हा शीघ्र जा.
हे 'मन्मनाभव' चे सर्वोत्तम उदाहरण आहे. ही तर कृष्ण विरहात व्याकूळ गोपिंची गोष्ट आहे.
आता एका दृष्टांताद्वारे ऐक, कशा प्रकारे श्रीकृष्ण कोणाच्या हृदयाचे हरण करतात, आपण जाणतो की कुणाला आपले हृद देणे किती कठीण असते, परंतु जर कुणी आपले हृदय घेतले तर हे अति सहज होऊन जाते. अन्यथा आपण आपल्या हृदयाला देणे असमर्थ होऊन जाते. कठ-उपनिषदे (१.२.२३) मध्ये कथित आहे.

नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन।
यमवैष वृणुते तेन लभस्तस्यैव आत्मा विवृणुते तनु स्वाम्।।

श्रीकृष्ण त्याच हृदयाला हरण करतील जे त्याला प्रिय आहे. जर आपण खरोखरीच त्यांना आपले हृदय समर्पित करण्याची इच्छा करु, तरीसुद्धा ते अतिकठीण आहे, परंतु जर श्रीकृष्ण आपल्या हृदयाला हरण करण्याची इच्छा करतील तरच ते संभव होईल. परंतु आपल्याला आपले हृदय असे घडवायला हवे की जेंव्हा कृष्ण त्याला बघतील तेंव्हा त्यांना ते हरण करण्याचा लोभ उत्पन्न व्हावा. हृदय समस्त प्रकारे स्वच्छ आणि शुद्ध असायला हवे. जर त्यात थोडी जरी अशुद्धता राहिली तर कृष्ण त्याचा स्वीकरा करणार नाहीत. परंतु केवळ हृदयाची शुद्धताच पयाप्त नाही कारण ज्ञानींचे हृदय देखिल शुद्ध असते. त्या शुद्धतेत आपल्याला काही विशेष सुगंध मिश्रित करावयास हवेत; जेणेकरुन जेव्हा कृष्ण त्याचा सुगंध घेतील तेव्हा त्याकडे आकर्षित होतील. तो सुगंध आहे भक्तिरसाचा, अर्थात् जेव्हा भक्ति रस हृदयात प्रवाहित होऊ लागतो तेव्हा कृष्ण आवश्यकही आकर्षित होतील. कृष्ण कशाप्रकारे हृदय हरण करतात, खालील कथेद्वारे याचे वर्णन केले गेले आहे- हा पूर्वरागातील गोपींच्या तन्मयतेचा प्रसंग आहे-

श्रीकृष्ण रोजच्या प्रमाणे त्याच्या सखांसोबत बंशीवादन करीत गोचारणाकरिता जात होते. त्यांचा वर्ण घनमेघाच्या वर्णासमान होता, त्यांचे कुरळे केस त्यांच्या मुखमंडलावर रुळत होते, त्यावेळचे त्यांचे सखा चारी बाजूंनी “साधू! साधू!!” म्हणत कृष्णाच्या महिमेचे गान करित होते तथा आपापली बंशी आणि श्रुंग वाजवत होते. जेंव्हा अशा प्रकारे क्रीडा करीत वनात गमन करीत होते, तेंव्हा समस्त व्रजवासी त्यांच्या दर्शनाकरिता त्यांच्या मार्गाच्या दोन्ही बाजूस एकत्रित होत असे. माता यशोदा आणि नंद बाबा कृष्णाच्या मागे-मागे चालतांना सांगत होते- “पुत्रा लवकर परत ये, जास्त दूर जाऊ नकोस.” कृष्ण पुनः पुनः त्यांना लवकर परतून येण्याचे आश्वासन देत होते, शेवटी जेव्हा कृष्णाने प्रतिज्ञापूर्वक सांगितले की मी अवश्य लवकरच परतीन, तेव्हा नंद-यशोदा हळू-हळू आपल्या घरी परतले.

व्रजमध्ये कित्येक नव-विवाहिता गोपी आल्या होत्या. त्य सर्व कृष्णाची एक झलक पहाण्याकरिता आपापल्या घरांच्या द्वारी येत. कुणी-कुणी गोपी खिडक्यातून डोकावून पाही, कुणी गच्चीवर येऊन पहात असे. कृष्णसुद्धा आपल्या नेत्रांच्या कोन्यातून त्यांना पहात असे. एक गोपी दोन-तीन दिवस आधी विवाहित होऊन आली होती. तिने आधीच गोचारणाला जाणाऱ्या श्रीकृष्णाच्या अतिमधूर रुपाविषयी ऐकले होते. तेंव्हा तिने कृष्णाची वंशी ध्वनी ऐकली तेंव्हा तिचे हृदय कृष्णाच्या दर्शनाकरिता व्याकूळ आणि उत्कंठित झाले. जेंव्हा ती गोपी दारातून बाहेर आली तेंव्हा तिची सासू आणि नणंद दाराबाहेरच उभी होती. त्यांनी तिला कृष्णाचे दर्शन घेण्यापासून थांबविले आणि म्हटले- “तू तिथे जाऊ नकोस. तेथे एक काळा साप आहे, जर त्याने तुला दंश केला तर मात्र तू जीवनभर त्याचे विष उतरवू शकणार नाही, तेंव्हा तू घरातच रहा, आम्ही आत्ता आलो.”

त्या गोपीने सांगितले- “तुम्ही दोघी जाणार आणि मी काय इथेच रहाणार? मी सुद्धा येणार.”

“नाही. तुझ्याकरिता धोका आहे. तुझे हृदय अजून अपक्व (कोमल) आहे. तू त्याच्या विषाला उतरवू शकत नाही, तेंव्हा तू येथेच थांब.”

व्रजच्या समस्त स्त्रिया, वृद्ध, बालक, बालिका, पक्षी, कीटक, पतंग सगळेच कृष्णाच्या दर्शनाकरिता जात होते. कृष्णाला समीप येतांना पाहून त्या गोपीची सासू आणि नणंद धावतच कृष्णाकडे गेल्या. जेंव्हा त्या दोघी निघून गेल्या तेंव्हा ती गोपी दवाखान्याच्या छिद्रातूनच कृष्णाला पाहू लागली. त्यावेळेस तिची स्थिती अशी होती की ती बाहेर कृष्णाला पाहू शकत होती परंतु तिला मात्र कुमीच पाहू शकत नव्हते. कृष्णाची वंशी त्याच्या अधरावर होती, आणि तो इतक्या मधुरतेने त्याचे वादन करीत होती की त्याच्या हृदयातील अमृत त्या वंशीच्या छिद्रातून निघून समस्त व्रजभूमीला आप्लावित करीत होते. ज्या नेत्रांनी या रुप माधुरीचे दर्शन नाही घेतले त्या नेत्रांची आवश्यकताच काय? ज्या नेत्रांनी या मधूर लीलांचे दर्शन केले आहे केवळ तेच कृतार्थ आहेत. गोपी कृष्णांची आरती करीत होत्या, दीपांनी नव्हे तर आपल्या नेत्रांनी. कशा प्रकारे? त्यांचे नेत्र दीपकाप्रमाणे होते तथा त्यांच्या हृदयात स्थिर असलेले प्रेम घृतसमान होते. त्यांचे प्रेम-प्रज्ज्वलित नेत्र कृष्णाच्या चारी बाजूंना फिरत होते तथा प्रेमपूर्ण कटाक्षांद्वारे कृष्णाची आरती करीत होते. अति आनंदपूर्वक, काहीशा लज्जेने कृष्णाने त्या सगळ्यांच्या प्रेमाचा स्वीकार केला. एवढे सगळे घडत असतांनादेखील कृष्ण त्या नववधू गोपीच्या घराकडे दाराकडे पहात होते. कृष्ण कुणाला दर्शन देऊही शकतात आणि नाहीसुद्धा, कारण ते स्वतंत्र भगवान आहेत, परंतू जर कुणी वास्तवात त्यांच्या दर्शनाकरिता उत्कंठित असेल, तर कृष्ण अवश्य त्याला दर्शन देतात. त्या दिवशी कृष्ण त्या नवविवाहित गोपीला दर्शन देऊ इच्छित होते. म्हणून ते सगळ्यांना सोडून तत्क्षणी तिच्याकडे जाऊ पहात होते. तेंव्हा कृष्णाने युक्तिपूर्वक एका बछड्याची शेपूट अशा प्रकारे धरुन ओढली की ते धावत-उड्या मारीत सरळ त्या गोपीच्या घराच्या

द्वाराशी जाऊन पोहोचले, जणू काही त्याला याच कामाकरिता प्रशिक्षित केले गेले होते.

कृष्णदेखील बछड्याच्या मागोमाग तेथे पोहोचला, काही क्षणांपुरती कृष्णाने तेथे आफली वंशी आपल्या अधरांवर ठेवली आणि तिला आपल्या परम मनोहर त्रिभंग रुपाचे दर्शन घडविले. मग काय! त्या गोपीचे हृदय आता तिचे राहिलेच कुठे! ते तर कृष्णाने हरण केले आणि तो पुनः आपल्या सखांसोबत मिसळून गेला. कृष्णाच्या जगत् विमोहक रुपाच्या दर्शनाने ती गोपी बाह्य-ज्ञान रहित होऊन तेथेच स्थिर झाली. यालाच कृष्णाद्वारे हृदय हरण करणे अथवा ‘मन्मना भव’ होणे म्हणतात.

जर कृष्णाची कुणावर विशेष कृपा होते तेंव्हाच ते त्याचे हृदय हरण करतात. जर आपण अत्यंत उत्कंठित होऊन आपल्या मनात सदैव चिंता करु की “कधी मी श्रीकृष्णाच्या रुप-माधुरीचे दर्शन प्राप्त करु शकेन?” यामुळे श्रीकृष्ण अतिप्रसन्न होऊन आपल्या चित्ताचे-हृदयाचे हरण करतील. त्या गोपीने या सौभाग्याला प्राप्त करण्याकरिताच लाखो वर्षे तपस्या केली होती आणि त्यादिवशी ती पूर्णरुपाने कृतार्थ झाली.

खूप वेळ लोटला. कृष्ण आपल्या सखांसोबत वनात पोहोचले होते तथा गाईंच्या खुरांमुळे उडणारी धूळ देखील आता बसली होती. परंतु ती गोपी मात्र अजूनही त्याच स्थानी निश्चल पुतळा होऊन उभी होती. कारण तिचे हृदय आणि मन तिच्यापाशी राहिले नव्हते, ती असहाय झाली होती. तेवढ्यात तिची सासू तिच्याकडे आली आणि तिला गदागदा हलवित म्हणाली- “शेवटी तेच झाले ना ज्याची मला भीती होती! त्या काळ्या सापाने तुला दंश केलाच तर. आता त्याच्या विषाला तू कधीच उतरवू शकणार नाही.” सासू तिला आपल्याबरोबर घरात घेऊन आली आणि तिला दही मंथन करण्यास लावले, जेणेकरुन काही दैहिक क्रिया केल्याने ती पुन्हा बाह्य ज्ञान प्राप्त करेल. परंतू त्या गोपीने दह्याच्या मडक्याऐवजी तेलाचे मडके उचलले आणि ते घेऊन ती मंथन करु

लागली, ज्यामुळे कर्कश ध्वनी होऊ लागला. पूर्ण बाह्य-ज्ञान नसल्या कारणाने कधी ती तेलाचे मंथन करी तर कधी थांबे. तिचे मन आणि हृदय ठिकाण्यावर होते कुठे? कृष्णाने त्याचे हरण केले होते. तो कर्कश ध्वनी ऐकून तिची सासू तेथे आली आणि म्हणाली, “अग! हे काय करतेस?” तेंव्हा मग सासूने तिचे मंथन करणे थांबविले आणि एकावर एक असे तीन हंडे तिच्या डोक्यावर ठेवले. तिच्या एका हातात पाणी भरण्याकरिता दोर आणि दुसऱ्या हातात एक लहान पोर दिले आणि तिला विहिरीतून पाणी शेंदून आणायला सांगितले. ती नववधू विहीरीवर पोहोचली आणि पाणी भरण्याकरीता मडक्याला दोर बांधू लागली, परंतू तिचे चित्त तिच्यापाशी नसल्या कारणाने ती मडक्याच्या जागी त्या पोराच्या गळ्याला दोर बांधू लागली. हे पाहून जवळच उभ्या असलेल्या अन्य गोपी म्हणाल्या, “हाय रे देवा! ही काय करीत आहे?” आणि असे म्हणून त्यांनी तिचा हात पकडला आणि पोराला वाचविले. एक गोपी म्हणाली, “असे झालेय तरी काय? असे वाटते की कदाचित हिला भूतबाधा झाली असावी.” दुसरी गोपी जी सर्व जाणत होती ती म्हणाली, “भूत नाही काही! हिला नंदाचा पूत लागलाय.” हेच आहे “मन्मना भव” चे उदाहरण.

वृंदावन केवळ त्या लोकांकरिता आहे जे आपले मन आणि हृदय आपल्या घर-परिवाराला देण्यास असमर्थ आहेत. ते या सर्वांना रडत सोडून अनाश्रितासमान वृंदावनात येतात आणि केवळ श्रीकृष्णाकरीता क्रंदन करतात. एवढेच काय पण राजा-महाराजा आणि ऐश्वर्ययुक्त धनवान लोकांचे सुकुमार पुत्र आणि पुत्री देखील वृंदावनात येऊन श्रीकृष्णाला आपले मन आणि हृदय अर्पण करुन भजन करतात. श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाले- “मन्मना भव” अर्थात आपल्या चित्ताला गोपींप्रमाणे माझ्याचरणी अर्पण कर.”

अर्जुनाने उत्तर दिले- “प्रभो! या रणक्षेत्री माझ्या चित्ताला तुमच्यात निविष्ट करणे कशा प्रकारे संभव आहे? आपण मला पितामह भीष्म,

द्रोणाचार्य आणि कर्णाविरुद्ध युद्ध करण्यास सांगितले आहे. तेंव्हा माझ्याकरिता 'मन्मना भव' शक्य नाही." तेंव्हा श्रीकृष्ण म्हणाले- "मद्भक्ता" - माझा भक्त बन

## तृतीय परिच्छेद

आत्तापर्यंत श्रीमद्भगवत्गीतेचा सर्वोत्कृष्ट आणि सर्वगुह्यत्तम श्लोक 'मन्मना भव' ची व्याख्या आरंभ करुन उदाहरणांसहित हे सांगितले गेलेय कि 'मन्मना भव' काय आहे? ज्या प्रकारे युद्धक्षेत्रात अर्जुनाला भगवान् श्रीकृष्णाद्वारे हा उपदेश दिला गेला. त्याचप्रमाणे आपण सारे देखील युद्धाच्या मैदानात उभे आहोत. आपली लढाई आहे, स्वभावतः चंचल मनाच्या वृत्तींशी त्यावेळेस कुरुक्षेत्रात कौरव आणि पांडवांमध्ये युद्ध सुरु होते. म्हणून ज्याप्रमाणे हे 'मन्मनाभव' अर्जुनाकरिता दुष्कर होते, त्याचप्रमाणे आपल्याकरितासुद्धा दुष्कर आहे.
पांडवांची सेना सप्त अक्षौहिणी आणि कौरव सेना एकादश अक्षौहिणी होती. आपल्यासमोर सुद्धा आज एकादश इंद्रिय स्वरुप एकादश अक्षौहिणी सेना आहे आणि आपण सर्वथा एकटे आहोत. भगवान् श्रीकृष्ण अर्जुनाचे रथवाहक होते, परंतु आपण मात्र आपल्या विकृत बुद्धीद्वारे प्रचलित आहोत. अर्जुनाकडे अग्निदेवाद्वारे प्रदत्त रथ होता, जो जाळता येणं किंवा नष्ट करणं शक्य नव्हतं, परंतु आपल्याकडे कोणता रथ आहे? मात्र हे भौतिक शरीर, जे व्याधिग्रस्त तथा नश्वर आहे. अर्जुनाकडे युद्धाकरिता गाण्डीव नामक धनुष्य होते, परं आपल्याकडे काय आहे? आपण सर्वथा असाहाय आहोत तथा एका दयनीय अवस्थेत आहोत. अर्जुनाच्या रथध्वजावर कोण विराजमान होते? श्री हनुमानजी यद्यपि अर्जुनाला सर्व प्रकारची सहाय्यता उपलब्ध होती,

तरीसुद्धा त्याचे मन विचलित झाले आणि ते म्हणाले, “हे प्रभो! मी मन्मना भव होण्यास असमर्थ आहे.”
हे शरीर म्हणजे रथ आहे; आत्मा रथी आहे आणि मन रथवाहक (स्वरुप) आहे. पण मनाचा स्वभाव काय आहे? चंचलता. त्याने आपल्याला कुठलीच मदत मिळत नाही. याच्या निर्देशनामुळे आपण पतित वा पथभ्रमित होऊन जातो. सर्वप्रथम अर्जुनाने करबद्ध होऊन सांगितले-

शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्....... (गीता २/७)

“हे प्रभो! सर्व प्रकारे मी आपली शरण ग्रहण करतो. आपण जसा आदेश द्याल, मी तेच करीन.” अर्जुनाने भगवान श्रीकृष्णाने दिलेले सर्व निर्देश ऐकले आणि मग म्हटले कि हे ‘मन्मना भव’ माझ्याकरिता संभव नाही. कारण माझ्यासमोर भीष्म, द्रोण, कर्ण, कृपाचार्य, दुर्योधन आणि दुःशासन सहित अनेक महारथी युद्धाकरिता एकत्रित आलेत.
अशा प्रकारे आपल्या समोर सहा महारथी उभे आहेत. ते कोण आहेत? वाणीचा वेग, जिव्हावेग, उदरवेग, उपस्थवेग, मनाचा वेग आणि क्रोधवेग. आपण यापैकी कुठलाही परास्त करण्यास अत्यंत असमर्थ आहोत. विश्वामित्र तथा नारदासारख्या महान व्यक्तिसुद्धा यापैकी एक वेग, उपस्थवेग (कामवासना) द्वारे प्रभावित झाले होते. एकदा नारदजी हिमालय पर्वतावरील गंगेच्या किनारी एका अत्यंत मनोरम स्थानी पोहोचले. त्या रमणीय स्थळी थांबल्यानंतर ते आपल्या स्वाभाविक निर्मळ मनाने श्रीहरिचे स्मरण करु लागताच त्यांची समाधी लागली. नारदमुनींची ही तपोमयी स्थिती पाहिल्यावर इंद्र घाबरला कि आपल्या तपस्येच्या बळावर हा माझे अमरावतीचे राज्य तर नाही ना बळकावणार? त्याने कामदेवाला बोलावून सांगितले, “तु आपल्या मदतनीसांसहित जा आणि नारदजींची समाधी भंग कर.” आश्रमात गेल्यावर कामदेवाने आपल्या मायेने वसंत ऋतू उत्पन्न करुन कामाग्नि भडकेल असे वातावरण सृष्ट केले. कामकलेत निपुण नवयुवती खूप प्रकारे शास्त्रीय

रागदारीवर आधारित ताना घेत गाऊ लागल्या तथा हातात चेंडू घेऊन विभिन्न प्रकारचे खेळ खेळू लागल्या. परंतू कामदेवांची कुठलीही कला मुनींवर प्रभाव पाडू शकली नाही. मग मात्र कामदेव आपल्या विनाशाच्या भीतीने घाबरला आणि मुनींच्या चरणावर पडून क्षमा मागू लागला. नारदजींना क्रोध आला नाही. आणि ते प्रिय वचन बोलून कामदेवाला समाधान देऊ लागले. परंतू नारदजींच्या मनात कामदेवाला जिंकण्याचा अभिमान झाला आणि त्यांनी गर्वयुक्त होऊन ही गोष्ट शिवजींना जाऊन सांगितली. शिवजी म्हणाले, तुम्ही मला सांगितले ते ठीक आहे परंतू श्रीहरींना याविषयी काहीसुद्धा सांगू नका, विषय निघाला तरी ही गोष्ट मात्र लपवा. नारदजींच्या शिवजींचा सल्ला पटला नाही. हातात वीणा घेऊन हरिगुण गात ते वैकुंठात श्रीनारायणाकडे पोहोचले आणि घडला प्रसंग भगवंतांकडे विदित केला. करुणानिधान भगवंताने मनात विचार करुन पाहिला की यांच्या मनात गर्वाच्या विशाल वृक्षाचा अंकूर फुटला आहे. मी तो उपटून टाकीन कारण सेवकांचे हित करणे हा माझा प्राण आहे. हृदयांत अभिमान वृद्धिंगत करुन नारदजी तिथून निघाले. तेव्हा मग लक्ष्मीपती भगवंताने आपल्या मायेला प्रेरित केले. त्या हरिमायेने रस्त्यात एक अत्यंत सुंदर नगर रचिले ज्यांत शीलनिधी नामक राजा होता. त्याचे विलास-वैभव शंभर इंद्रासमान होते. त्याची विश्वमोहिनी नामक एक रुपवती कन्या होती जिचे स्वयंवर होणार होते. नारदजी त्या नगरातील राजाच्या महाली पोहोचले. राजाने आपल्या रुपवती कन्येला बोलाविले तथा तिच्या स्वयंवराच्या आयोजनाची गोष्ट नारदजींना सांगितली. त्या राजकुमारीचे सौंदर्य पाहून मुनी आपले वैराग्य विसरुन बराच वेळ त्या कन्येकडे पहात राहिले. मनोमन विचार करु लागले कि असा कोणता उपाय जेणे करुन ही कन्या माझे वरण करेन, अशावेळी जप-तपाने काहीच होऊ शकत नाही. मला तर आता बरेच वैभव आणि अत्यंत सुंदर रुप हवे आहे जेणेकरून ही राजकुमारी माझ्यावर भाळेल आणि माझ्याच गळ्यात जयमाळा घालेन. असा

विचार करित-करित ते तेथून निघाले. त्यावेळेस नारदजींनी भगवान् नारायणाची अनेक प्रकारे विनंती केली. लीलामय-कृपाळू प्रभू प्रकट झाले. नारदजींनी अतिदीन होत सर्व वृत्तांत ऐकविला आणि बोलले, “हे प्रभो! आपण आपले रुप मला प्रदान करा, कारण अन्य कुठल्याही प्रकारे मी राजकन्येला प्राप्त करु शकत नाही.”

जोहि विधि नाथ होइ हित मोरा।
करहु सो बेगि दास मैं तोरा।।

आपल्या मायेचे विशाल बळ पाहून प्रभू हसतच म्हणाले- हे नारदजी! ऐका, ज्यामुळे आपले परमहित होईल मी तेच करीन. हे मुनी! रोगाने व्याकुळ रोगी जर कुपथ्य मागू लागला तर वैद्य ते देऊ शकत नाही. मी देखील तुझे हित करण्याचा निश्चय केला आहे. असे म्हणून भगवान अंतर्धान पावले.

मायेने वशीभूत झालेले मुनीवर इतके मूढ बनलो की भगवंतांची निगूढ वाणी ते समजूच शकले नाहीत. ते लगोलग स्वयंवरभूमीकडे निघाले. राजे-महाराज खऊप नटून-थटून आपल्या गोतावळ्यासहित आपापल्या आसनांवर बसलेले होते. नारदजी मनोन प्रसन्न होत होते- कि माझे सुंदर रुप पाहून राजकन्या चुकूनसुद्धा दुसऱ्या कोणाचे वरण करणार नाही. कृपानिधान भगवंताने मुनींच्या कल्याणाकरिता त्यांना माकडाचा कुरुप चेहरा दिला होता. राजकुमारीने जेंव्हा सभेत प्रवेश केला तेंव्हा नारदजी तिच्या अगदी समोर उभे होते. त्यांचे ते माकडासारखे मुख आणि भयंकर शरीर पाहून ती तोंड फिरवून राजहंसिणीच्या चालीने पुढे चालत गेली. नारदमुनींनी येन केन प्रकारेण तिचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला, मात्र राजकुमारीने त्यांच्याकडे पाहिलेसुद्धा नाही. त्याचवेळी श्रीनारायण देखील राजाचे शरीर धारण करुन तेथे आले. राजकुमारीने हर्षित होऊन त्यांच्या गळ्यांत जयमाला घातली आण भगवान् आपली वधू घेऊन निघून गेले. मोहकारणाने मुनींची बुद्धी नष्ट झाली होती. राजकुमारीला अशी जातांना पाहून ते अत्यंत विकल झाले. तेथेच

शिवजींचे दोन गण ब्राह्मण वेशात बसले होते, ते हसून म्हणाले- जरा जाऊन आरामात आपले तोंड तरी बघ! मुनींनी जळांत आपला चेहरा पाहिला. माकडाचा चेहरा पाहून ते अत्यंत क्रोधित झाले तथा भगवान् श्रीहरिंना अनेक खरेखोटे वचन सुनविले, अगदी शाप सुद्धा दिला! प्रभूंनी लगेचच आपली माया हटविली. तेंव्हा मग मुनींची चेतना परतली कि मी काय केले आणि त्यांनी अत्यंत भयभीत होऊन श्रीहरीचे चरण पकडले. या महारथींच्या ही अतिरिक्त आपल्याला अनेक प्रकारच्या अनर्थांचा सामना करावयास लागतो. म्हणून भगवान् म्हणतात, “मद्भक्तो- तू माझा भक्त बन.” अर्जुनाने विचार केला आणि म्हणाला कि मी भक्त होईन असे म्हणणे फार सोपे आहे, परंतू वास्तवात असे करणे अत्यंत कठिण आहे.

भक्त बनण्याकरिता हे विशेषतः आवश्यक आहे की-

अन्याभिलाषिता शून्यं ज्ञानकर्माद्यनावृत्तम्।
आनुकुल्येन कृष्णानुशीलनं भक्तिरुत्तमा।। (भ.र.सिं. १.१.११)

साधकाच्या मनात कुठल्याही प्रकारची भौतिक इच्छा नसावी. भगवान् श्रीकृष्ण वा त्यांच्या शुद्ध भक्तांची सेवा तथा भक्ति लाभा करण्या अतिरिक्त हृदयांत कुठल्या अन्य अभिलाषेचा गंधमात्रही नसावा. अन्याभिलाषेची बातच काय पण तिचा गंधमात्र देखील असणे वर्जित आहे. या विचारांना ध्यानपूर्वक ऐका आणि अशा आचरणाचा प्रयत्न करा तेव्हाच भक्ति तत्व समजू शकाल. अन्यथा हे खूप कठीण आहे. हृदय, ज्ञान आणि कर्माच्या प्रवृत्तींपासून शून्य (रहित) व्हायला हवे. कोणतीही व्यक्ति कर्माशिवाय जीवित राहू शकत नाही. ती काही ना काही कर्म तर करतच असते. इतकेच काय पण झोपल्यानंतरही आपण कर्मरत असतो. जसे श्वास घेणे, कुस बदलणे, व स्वप्न पहाणे, हे सर्व काही कर्मा अंतर्गतच मोडते. तेव्हा कर्म अपरिहार्य आहे, कर्माशिवाय आपण एक क्षणसुद्धा जीवित राहू शकत नाही. जर कुणी असे म्हणत असेल की तो कुठलेही कर्म केल्याशिवाय जिवंत आहे, तर तो पाखंडी

आहे. कर्म तर आपल्याला करावेच लागते. आपल्याला भोजन करावे लागते, तथा स्वतःला थंडीपासून वाचविण्याकरिता कपडे घालावेच लागतात. पण आपण आपल्या भक्तिला कर्माने आवृत्त होण्यापासून कसे वाचवू शकतो? जर कार्य करतांना आपण भगवंताचे स्मरण ठेवू शकलो, म्हणजेच जर आपण भगवद सेवेच्या अभिलाषेकरिता भोजन ग्रहण
करु शकलो तर हे कार्य भक्तिला आच्छादित करु शकणार नाही.
आपल्या वर्तमान स्थितीत आपण ज्ञानाविना जीवित राहणे देखील अशक्य आहे. ज्ञानही आवश्यकच आहे कारण ज्ञानाशिवाय आपण हे देखील जाणू शकणार नाही की चालतांना पाय कोठे ठेवायला हवेत, अन्यथा आपण खाली पडू शकतो.

परंतू या गोष्टी (ज्ञान आणि कर्म) भक्तिला कशाप्रकारे आच्छादित करु शकतात? पहा, (भरत महाराजांचा वृत्तांत प्रस्तुत आहे) दुसऱ्याची मदत करण्याची चेष्टा करता करता भरत महाराजांकडून एक चूक झाली तथा ते भक्ति मार्गातून (च्यूत) पतित झाले. साधन-भक्ती करता करता त्यांनी भक्तिची एक उच्च दशा, भावदशा प्राप्त केली होती. त्यांनी एका शिशू हरणाची सिंहापासून रक्षा केली तथा त्याला नदीत बुडण्यापासून वाचविले. नंतर दूध आदि पाजून त्याचे पालन-पोषण केले. हे सगळे त्यांनी एका असहाय जीवाच्या मदतीकरिता केले. परंतू हळू हळू त्यांची त्या हरिणांत इतकी आसक्ति निर्माण झाली की ते भगवद्जन विसरुन गेले. या कर्माकरिता त्यांना आणखी तीन वेळा जन्म ग्रहण करावा लागला.

म्हणून ज्ञान व कर्म सर्वदा वर्तमान असूनसुद्धा त्यांना नेहमी भक्तिच्या अधीन ठेवावयास हवे. अन्यथा आपली भक्ति त्यांच्या योगे आच्छिदित होऊन जाईल. तेंव्हा ज्ञान आणि कर्माचा व्यवहारात कसा उपयोग करावा? (उदाहरणतः) विग्रह सेवेकरिता, बाजारात जाऊन आपल्याला उत्तम फळे आणि भाज्या आणायला हव्यात. भगवान (विग्रहरुपात) भोग-नैवेद्य

ग्रहण करतात. मग सर्वांना प्रसाद वितरण करावयास हवा. यामुळे भक्ति आच्छिदित न होता वर्धितच होईल.

याच्या विपरित एखादा उत्तम पदार्थ संग्रहित करुन जर आपण आपल्या इंद्रियतृप्तीकरिता एखादे स्वादिष्ट व्यंजन तयार करतो, तर ते व्यर्थ आहे तथा हे कार्य आपली भक्ति आच्छादित करणारे आहे. म्हणून आपल्याला अत्यंत सावधान रहायला हवे.

जर एखादे व्यंजन असा विचार करुन सिद्ध केले जाते की हे मी बनविले आहे, मीच याची आवश्यक सामग्री एकत्रित केली, धन संग्रहित केले, आणि मीच याचा भोग करीन आणि मग ते भगवंतास अर्पित केले गेले, तर ते पूर्णतः योग्य नाही. केवळ बनविल्यानंतरच नाही तर पाकसिद्धीच्या प्रारंभिक क्रियेपासून आपण ते भगवंतास अर्पित करावे.

यथा- यज्ञार्थात् कर्मणोऽन्यत्र......... (गीता ३.९)

तुमचे प्रत्येक कार्य भगवंताच्या सेवेकरिता (यज्ञार्थ) असावयास हवे. हा सर्व भगवद्गीतेचा उपदेश आहे. तुम्ही जे खाता अथवा पिता, ते सर्व यज्ञार्थच असायला हवे.

यक्तरोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासियत्।
यत्तपस्यासि कौंतेय तत्कुरुष मदर्पणम्।। (गीता ९.२७)

तुम्ही जे काही करता, भोजन बनविता, यज्ञ करता, तपस्या करता, दान करता, ते सर्व काही विग्रह सेवेकरिताच व्हायला हवे. साधारणतः विश्वभरातले धार्मिक व्यक्तिगण याच प्रकारे कर्मरत असतात. परंतू श्रीचैतन्य महाप्रभू आणि गौडीय आचार्यांनी शिकविले आहे की आपण कशा प्रकारे कर्म करु नये. त्यामुळे आपण बंधनातच पडू. प्रथम नस्वतःला भगवद्चरणी समर्पित करावयास हवे. नंतर आपण जे काही खाऊ किंवा करु, ते भगवद् सेवार्थच असेल.

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं
अर्चनं वंदनं दास्यं सख्यम् आत्मनिवेदनम्।
इति पुंसार्पिता विष्णौ भक्तिश्चेन्नवलक्षणा

क्रियेत भगवत्यद्धा तन्मन्येऽधीतमुत्तमम्।। (श्री भा. ७.५.२३.२४)
भगवान् श्रीकृष्णाच्या दिव्य नामाचे, गुणांचे, रुपाचे, लीलांचे श्रवण आणि किर्तन करणे, त्यांचे स्मरण करणे, त्यांच्या चरणांची सेवा करणे, त्यांची पूजा करणे, त्यांची वंदना करणे, दास भावाने त्यांची सेवा करणे, त्यांचे प्रिय मित्र होणे व संपूर्ण रुपात स्वतःला त्यांच्या चरणी समर्पित करणे. ही नवविधा भक्ति आहे. साधारणतः या जगातले लोक यापासून अनभिज्ञ आहेत. ते केवळ हा विचार करतात कि त्यांनी भगवंताला काही वस्तू भेट करायला हव्यात, परंतू शुद्ध भक्त या क्रियेच्या असंपूर्णतेने परिचित आहेत. म्हणून सर्वप्रथम आपल्याला स्वतःलाच समर्पित करावयास हवे, केवळ आपल्या कर्मफळालाच नाही. कर्मयोगाचे पालन करणारेच असे (कर्मफळाचे समर्पण) करु शकतात. हे असेच आहे जसे एक छोटे बाळ आपल्या पित्याच्या मांडीवर बसून काहीतरी खात आहे. कोणती खाद्यवस्तू दिसताच (मिळताच) ते ती आपल्या तोंडात घालते तथा आपल्या पित्याच्या तोंडातही घालते. पिता बालकाच्या या व्यवहाराने रागवित नाही, परंतू प्रसन्नच होतो. का? कारण बालक सर्वथा पित्यावरच आश्रित आहे. पिता पुत्राला शिक्षा देखील करतो, परंतू तरीही पुत्रपित्याला सोडत नाही.
भगवंताबरोबर अशाप्रकारे संबंधयुक्त होण्याकरिता सर्वप्रथम आपल्याला आपल्या गुरुदेवांना सर्वस्व समर्पित करावयास हवे. वर्तमान स्थितीत तेच आपल्याकरिता भगवंतासमान आहेत. जेव्हा आपण भगवंताशी साक्षात् संबंधयुक्त होऊन जाऊ तेव्हा औपचारिकतांची आवश्यकताच भासणार नाही. (उदाहरणस्वरुप) गोपी स्वतः भोजन करतात तथा स्वतःला सुसज्जितदेखील करतात, परंतू औपचारिकतावश (भगवान्) श्रीकृष्णाला काही भेट देत नाहीत (निवेदन करीत नाहीत) वा त्यांची पूजा करीत नाहीत. सुंदर वेशभूषा धारण करतांना त्या अनेक प्रकारची आभूषणे घालतात, परंतू हे सगळे कुणाकरिता? हे सगळे त्या श्रीकृष्णाच्या प्रसन्नेकरिता करतात. त्यांचे सर्वस्वच स्वभावतः

श्रीकृष्णाच्या सेवेकरिता आहे. अशाप्रकारे आपल्याला सर्व काही एकमात्र श्रीकृष्णाच्या प्रसन्नेकरिताच करावयास हवे. अशी भक्ति दुष्प्राप्य आहे तथा याकरिता पूर्वजन्माची सुकृति असणे आवश्यक आहे. परंतू या जन्मातसुद्धा जर भगवंताच्या कृपेने आपल्याला शुद्ध वैष्णवांचा संग प्राप्त करण्याचे सौभाग्य मिळाले तर शुद्ध भक्ति निश्चितच उदित होईल.

श्री बिल्वमंगल ठाकूर यांची कथा याचे एक उपयुक्त उदाहरण आहे. त्यांचा जन्म दक्षिण भारतात कृष्णा-वेण्णा नदीच्या तटावरील एका गावी झाला. ते वेद-वेदांत इत्यादीचे प्रकांड पंडित होते, तथापि चिंतामणी नामक एका वेश्येवर अत्याधिक आसक्त होते. एकदा काय झाले, रात्रीची वेळ होती, घनघोर वर्षा होत होती. परंतू चिंतामणीला भेटण्याकरिता ते इतके अधीर झाले की कुठल्याही गोष्टीची पर्वा न करता तिला भेटण्याकरिता निघाले. रस्त्यात एक नदी आडवी येत असे. पुरामुळे त्या भयानक रात्री उफाळत्या नदीने काळस्वरुप धारण केले होते. नदी पार करण्याचे अशावेळेस कुठलेच साधन नव्हते. बिल्वमंगल नदीच्या किनाऱ्याने वाहत चालले असता एका प्रेताचा आधार घेत ते नदीच्या पात्रात तरंगत दुसऱ्या किनारी पोहोचले. जेव्हा ते चिंतामणीच्या घरी पोहोचले तेंव्हा तिचे घर बंद होते. छप्पराला लटकणाऱ्या सापाला दोर समजून, त्याच्याच मदतीने वर चढले परंतू पाय घसरल्याने खिडकीतून आत पडून अचेत झाले. काहीतरी पडण्याच्या आवाजाने आपल्या सखींबरोबर चिंतामणी बाहेर आली आणि विद्युतप्रकाशात बिल्वमंगलला पाहिल्याबरोबर तिला सारा प्रकार समजला. चिंतामणिने स्वतःला धिक्कारित बिल्वमंगलला देखील फटकारले. ती म्हणाली तुझी जितकी आसक्ती माझ्यात आहे, जर इतकी आसक्ती श्रीकृष्णाच्या चरणी असती तर निश्चितच तुझे कल्याण झाले असते. चिंतामणिचे ते हृदयस्पर्शी बोल ऐकून बिल्वमंगलचे डोळे उघडले आणि ते तेथून थेट वृंदावनाच्या दिशेने निघाले.

रस्त्यात त्यांना तहान लागली. जेव्हा ते एका गावातून चालले होते, तेव्हा एका स्त्रीला विहीरीतून पाणी शेंदतांना पाहिले. ते पाणी पिण्याकरिता तेथे गेले, परंतू त्या स्त्रीच्या रुपावर मुग्ध झाले. त्या स्त्रीच्या मागे-मागे तिच्या घरापर्यंत जाऊन पोहोचले. स्त्रीच्या पतीने साधू समजून सन्मान देत त्यांना आत बोलावून बसावयास आसन दिले. बिल्वमंगलने त्यास आपल्या स्त्रीला बोलाविण्याचा आग्रह केला. पतिच्या बोलावण्यावरुन ती स्त्री बाहेर आली. त्यांनी तिच्याकडे तिच्या केसांत खोवलेल्या सुया मागितल्या. स्त्री आणि तिच्या पतिने विचार केला, भ्रमणशील साधू आहे, कदाचित त्यांच्या पायात काटा रुतला असावा जो काढण्याकरिता ते सुई मागत असावेत. त्यांनी सुया दिल्या.

बिल्वमंगलना काटा तर अवश्य काढायचा होता. ज्यापर्यंत ते पोहचू शकत नव्हते. म्हणून त्यांनी सुया घेऊन आपले दोन्ही डोळे फोडून घेतले. 'बासच नाही राहिला तर बासरी तरी कशी वाजेल?' हे नेत्र या जड जगतात आपल्या आसक्तिचे मूळ कारण आहे, कारण स्त्रीचे रुप पुरुषाला तथा पुरुषाचे रुप स्त्रीला आकर्षित करीत असते. हे दोन्ही मायेचे मूर्तिमान स्वरुप आहेत. म्हणून श्रीमद्भागवत न अन्य शास्त्र याविषयी विशेष सावधान रहाण्याकरिता आपल्याला निर्देश देतात.

डोळ्यातून अविरत रक्त प्रवाहित होत होते. तेथून नेत्रहीन होऊन ते वृंदावनाकरीता पुनः चालू लागले, परंतू आता त्यांचे हृदय पवित्र झाले होते. थोडे दूर गेल्यानंतर त्यांच्याजवळ एक बालक आले. त्या बालकाने अत्यंत मधूर स्वरात विचारले, "बाबा! आपण कोठे चाललात?"

बिल्वमंगलने उत्तर दिले, "मी वृंदावनात चाललोय." बालक म्हणाले, "मी सुद्धा वृंदावनात चाललोय. आपण माझी ही काठी पकडा." ते बालक दुसरे कुणी नसून स्वयं मुरली नोहर श्रीकृष्ण होते.

ते दोघेही एकत्र चालू लागले आणि चालता-चालता वृंदावनात येऊन पोहोचले. मार्गात काय झाले? बिल्वमंगलने आपल्या हृदयात भगवान

श्रीकृष्णांसंबंधी अनेक तत्वांची अनुभूती (स्फूर्ती) केली. जी अमृततुल्य होती. त्याचे नाव साधना आहे. बिल्वमंगल ठाकूर एक साधक होते. याआधी गोपींविषयी जे वर्णित केले गेले आहे ती सिद्धावस्था आहे. ज्याप्रकारे हिमालयातून उदित होऊन गंगा कुठल्याही विशेष प्रयत्नांशिवाय स्वभावतःच समुद्राकडे प्रवाहित होते, त्याचप्रमाणे गोपींची हृदयगती (प्रवृत्ति) न थांबता श्रीकृष्णाच्या चरणांकडे प्रवाहित होते. हा सिद्धिचा स्तर आहे, परंतू येथे आपण साधनेची आलोचना करित आहोत. भक्तिरसामृतसिंधू तथआ अन्य ग्रंथांचे हेच मत आहे की बिल्वमंगल ठाकूर एक साधक होते, केवळ प्रथम सोपानावर उभे राहून आपण स्वतःला वास्तविक साधक म्हणून घेण्याचा अभिमान करु शकू काय? श्रवण, कीर्तन, विष्णू-स्मरण, पादसेवन, दास्य, अर्चन, वंदना, सख्य, आत्मनिवेदन रुपी नवविधा भक्ति दोन प्रकारची असते. एक आहे- वैधी भक्ति दुसरी रागानुगा भक्ती. भक्ती अशा तऱ्हेने दोन प्रकारची असते तसेच आपल्याला दोहोंचे पालन करावयास हवे. असे नाही की आपल्याला वैधी भक्ती सोडून द्यायला हवी, परंतू आपल्याला आंतरिक भावना बदलतील. बाह्यतः आपले स्वरुप तेच राहील परंतू हृदयात निष्ठा प्रबळ होईल. अशा प्रकारच्या निष्ठावान साधकांना वास्तविक साधक म्हणता येऊ शकते. ते साधना कशी करतात? अश्रूपूर्ण नेत्रांद्वारे आपल्या हृदयाला एका पुष्पाप्रमाणे श्रीकृष्णाचरणी समर्पित करतात. परंतू काही करण्याआधीच श्रीकृष्ण स्वयं येऊन ते पुष्प ग्रहण करतात. जसे बिल्वमंगलसोबत घडले. ते एक साधक होते आणि शेवटी काय झाले? भगवान् कृष्ण स्वतः आले आणि त्यांचे हात पकडून त्यांना वृंदावनात घेऊन गेले. ते अशा प्रकारे साधनेत रत होते की दिवसरात्र भगवंताच्या ध्यानातच निमग्न होते. ते सख्यभावात आविष्ट होऊन श्रवण, किर्तन, स्मरण व पादसेवन करित होते. आपणासही अशाप्रकारे साधना करावयास हवी, ज्यात ज्ञान आणि कर्माचा लेशमात्रदेखील स्पर्श नसावा. तेंव्हा क्रमशः निज चिद्स्वरुप उदित होऊन आपण श्रीकृष्णाची

साक्षात् सेवा करु शकू. एका रागानुगा भक्ताला अशाप्रकारे साधना करावयास हवी.

श्रील रघुनाथदास गोस्वामी देखील एक उदाहरण आहेत. यद्यपि आंतरिक रुपात ते सिद्ध होते, परंतू बाह्य रुपात त्यांनी एका साधकासमान आचरण केले.

संख्यापूर्वक-नामगाननतिभिः कालवसानीकृतौ
निद्राहार-विहारादि-विजितौ चात्यन्त-दीनौच यौ।
राधाकृष्ण-गुणस्मृतेर्मधुरिमानन्देन सम्मोहितौ
वंदे रुप-सनातनौ रघुयुगौ श्रीजीव-गोपालकौ।।
(श्रीषड्गोस्वामी अष्टक-६)

प्रतिदिन नियमित रुपाने एक लाख हरिनाम संख्या पूर्ण झाल्यानंतरच ते जल ग्रहण करित असत. नियमित वैष्णवांना, धाम तथा श्रीकृष्णलीलास्थळांना एक हजार वेळा दंडवत प्रणाम करित असत. त्यांच्या स्वभावात मृदुता आणि दीनता होती आणि दिवारात्र ते कृष्णाच्या चिंतनात निमग्न असत.

लहानपणीच त्यांनी आपले पारिवारिक गुरु यदुनंदन आचार्य यांच्याकडून दीक्षा ग्रहण केली होती; तसेच हरिदास ठाकूर यांचा संग प्राप्त केला होता. हरिदास ठाकूरांच्या संग प्रभावामुळे त्यांनी हरिनाम करण्यास आरंभ केला. श्रीदास गोस्वामी एक नित्यसिद्ध परिकर आहेत. परंतू प्रत्यक्ष रुपात त्यांनी एका साधकासमान आचरण करुन आपल्या सर्वांना शिक्षा प्रदान केली आहे.

कालांतराने श्रील रघुनाथदास यांचा स्वर्गातील अप्सरेसमान सुंदर कन्येबरोबर विवाह झाला. ते स्वयं एखाद्या राजकुमारासमान होते तथा त्यांचे शरीर देखील अत्यंत सुंदर व सुकोमल होते. सोळा वर्षांच्या अल्पायुमध्येच ते कृष्ण विरहात उन्मत्त होऊन गेले. कित्येकदा त्यांनी घर सोडण्याचा प्रयत्न केला परंतू त्यांचे घरचे सदस्य त्यांना पुन्हा पकडून माघारी घेऊन येत. नित्यानंद प्रभूंची सेवा करुन त्यांना

नित्यानंद प्रभूंची कृपा प्राप्त झाली. तपपश्चात् कसेतरी ते धरुन पळून जाण्यात यशस्वी ठरले. रात्री ते जंगलाच्या रस्त्याने पळाले जेणेकरुन कुणी त्यांना पकडू नये. सातत्याने सात दिवस ते न खाता-पिता चालत राहिले, सातव्या दिवशी एका गवळ्याने त्यांना थोडे दूध आणि कुरमुरे खाऊ घातले. इतक्या लहान वयात ते रात्रंदिवस चालत-चालत अंततः जगन्नाथपुरीला येऊन पोहोचले.

आजच्या आधुनिक काळात आपण धामयात्रा करण्याआधी रेल्वेगाडीत आरक्षण करतो तसेच हजार-दोन हजार रुपये बरोबर घेऊन जातो. परंतू धामयात्रेची ही पद्धत नाही. रघुनाथदासाने आपल्या रहाण्याची, खाण्याची, झोपण्याची चिंता न करता आपल्या घर परिवाराच्या पूर्ण रुपाने परित्याग केला तथा कृष्णमिलनाच्या उत्कंठेने ते सतत रडत असते. पुरीला गेल्यानंतर श्रीचैतन्य महाप्रभूंनी त्यांचे आलिंगन केले आणि म्हटले, “तू येथे येण्याकरिता विष्णुरुपी कूपाचा (अर्थात्-संसारगृह) परित्याग करुन आला आहेस,” महाप्रभूने पुनः त्यांना आलिंगन दिले. जवळच स्वरुप दामोदर बसले होते, महाप्रभूने पुनः रघुनाथ दासला त्यांच्या सुपुर्द करित ते म्हणाले, “आजपासून स्वरुप दामोदरच तुझे पिता, माता, भ्राता, गुरु सर्व काही आहेत. आज मी तुला यांच्या हाती सोपवित आहे. तु कुठल्या गोष्टीची चिंता करु नकोस.” अशा प्रकारे भगवंताने स्वतः श्रील रघुनाथदासला अशा उन्नत गुरुच्या हाती सोपविले.

श्रील रघुनाथदास पुरीत अत्यंत वैराग्यपूर्वक राहू लागले. त्यांचे धनी पिता-त्यांच्या रहाण्या-खाण्याची व्यवस्था करु पहात होते, परंतू त्यांनी ते स्वीकार केले नाही. ते जगन्नाथजींच्या स्वयंपाकघरातून फेकले गेलेले सडके तांदूळ जे गायदेखील खात नसे, ते घेऊन येत पाण्याने धुवत आणि मीठ घालून खात असत तथा त्यावरच आपला उदरनिर्वाह करीत असत. त्यांची एकमात्र संपत्ती एक मातीचे जलपात्र होते; त्यांच्याकडे कुठली थाळी अथवा घोंगडेदेखील नव्हते. पुरी समुद्र तटावर स्थित आहे,

म्हणून तेथे जास्त गरम अथवा थंडी नसते. म्हणून कसेतरी ते आपल्या झोपण्याची व्यवस्था करीत असत. लोकांनी टाकलेल्या वस्त्रांपासून दोन कौपीन बनवून त्या धारण करुन भजन करीत असत. परंतू आपण आपल्याकडे पाहिले का की आपण कसे रहातो आणि काय घालतो ते? आपल्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी महाप्रभूंनी हे जग सोडून आपली लीला संगोपन केली. त्यांच्या विरहात श्रील रघुनाथदासने खाणेपिणे त्यागले, दिवसरात्र रडत बसत यालाच साधन म्हणतात. आणि जे असे जीवन व्यतित करतात ते साधक आहेत. तत्पश्चात् महाप्रभूंच्या विरहात स्वरुप दामोदरांनीसुद्धा आपला देह सोडून गोलोक व्रजधामी प्रवेश केला. त्यानंतर तर श्रील रघुनाथदासने पाणी पिणे देखील त्यागले व ते रात्रंदिवस केवळ रुदन करीत बसत. ते नंतर पुरीत राहू शकले नाहीत कारण त्यांची दशा अशी होती जशी कृष्ण मथुरेला गेल्यानंतर नंदबाबांची झाली होती. आपल्या घरातील प्रत्येक वस्तू (कृष्णाचे पितांबर, कृष्णाची बासरी, कृष्णाचे मोरपंख) नंदबाबांना कृष्णाची आठवण करुन देत होती. अशी तीव्र विरहाची अनुभूती झाल्यानंतर ते घराबाहेर पडत असत. यमुनेतटी गेल्यानंतर तेथे कृष्णाचे पदचिन्ह पाहून पुन्हा विरहकातर होत. ते तो वृक्ष पहात ज्यावर चढून कालिया दमन करण्याकरिता कृष्णाने यमुनेत झेप घेतली होती. यामुळे नंदबाबांना आणखीच तीव्रतेने कृष्णाची आठवण होत असे; मग ते आपले नेत्र बंद करुन घेत असत. मग ते गोवर्धनाकडे जात, तेथे त्यांना वाटे जणू सगळे वृक्ष विरहात एकमेकांवर झुकून रडत आहेत आणि विचारित आहेत, “कृष्ण कोठे गेले?” राधाकुंड, श्यामकुंड, कुसुम सरोवर तथा मानसीगंगा त्यांचा विरहताप अधिकच तीव्र करीत असत. शेवटी ते पुन्हा घरी परतून येत.

अशाचप्रकारे श्रील रघुनाथदास पुरीत जे काही पहात त्यामुळे त्यांना श्रीचैतन्य महाप्रभू तथा स्वरुप दामोदरांची स्मृती होत असे. म्हणून पुरीमध्ये रहाण्यास सर्वदा असमर्थ होऊन ते पायी चालत वृंदावनात

पोहोचले. तेथे जाऊन त्यांनी स्वतःला श्रील रुप गोस्वामी तथा श्रील सनातन गोस्वामींच्या चरणी समर्पित केले. त्यांनी विचारले- “तू येथे का आला आहेस?” दास गोस्वामी उत्तरले- “श्रीचैतन्य महाप्रभू आणि स्वरुप दामोदर या जगातून निघून गेलेत तेव्हा मी सुद्धा त्यांच्याशिवाय येथे नाही राहू शकत. मी गोवर्धनावरुन उडी मारुन अथवा अर्ध्यारात्री राधाकुंडात बुडून देहत्याग करित तथा श्री राधाजींच्या चरणांस प्राप्त करीन, मी येथे याकरिता आल आहे.” दिव्य विरह असाच असतो. श्रील रुप तथा श्रील सनातन यांनी राधाकुंडाजवळ आत्महत्या करण्यापासून परावृत्त केले तथा त्यांना राधाकुंडाजवळ वासस्थान दिले. येथे राहूनच ते आपली सेवा- साधन-भजन करीत. कालांतराने महाप्रभूंच्या विरहाने श्रील रुप-सनातन देखील हे जग सोडून गेले. दास गोस्वामींनी विचार केला आता मी कोणाचा आश्रय आधार घेऊ? श्रील रुप-सनातनांच्या विरहात गिरिराज गोवर्धन त्यांना एखाद्या अजगरासमान भासत, जणू काही त्यांना गिळून टाकतील, राधाकुंड एखाद्या वाघिणीसमान भासे. नंदग्राम, बरसाना तथा अन्य लीलास्थळे शून्यासमान अर्थात् रिक्त वाटत होती. श्रील रुप गोस्वामींच्या विरहात त्यांनी पाणी पिणेसुद्धा सोडून दिले, आपला जीव धारण करण्याकरिता कधी-कधी ताकाचे थोडे थेंब ते ग्रहण करीत असत. राधाकुंडाच्या तटी विरहकातर होत रडत रडत म्हणत-

हे राधे! ब्रजदेविके! च ललिते! हे नंदसूनो! कुतः
श्रीगोवर्धन- कल्पपादप-तले कालिंदिवन्ये कुतः
घोषंताविति सर्वतो व्रजपुरे खैदेर्महाविव्हलै।
वंदे रुप-सनातनौ रघुयुगौ श्री जीव-गोपलकौ।।
(श्रीषड् गोस्वामी अष्टकम्-८)

“हे व्रजच्या पूजनीय देवते! राधिके! आपण कुठे आहात? हे ललिते! आपण कुठे आहात? हे ब्रजकुमार! आपण कुठे आहात? श्रीगोवर्धनाच्या

कलावृक्षांखाली बसलेले आहात अथवा कालिंदीच्या कमनीय तटावर विराजमान वन समुहांमध्ये भ्रमण करित आहात?”
अशाप्रकारे पुकारत-पुकारत रघुनाथदास गोस्वामी विरहात भावाकुल होऊन व्रजच्या चारी दिशांना विचरण करीत होते. ते अशा प्रकारे भजन करीत होते. त्यावेळी ते आपल्या हृदयस्थ भावपुष्पांची माळा बनवून श्रीमती राधिकेच्या पदनखज्योतिस अर्पण करीत तथा म्हणत- राधे- राधे- राधे....! श्री राधाकृष्णास प्राप्त करण्याचे हेच साधन आहे. कर्मयोगाच्या साधनेद्वारे सहजच स्वर्गाची प्राप्ती केली जाऊ शकते. तपस्येद्वारे ध्रुवाने सशरीर वैकुंठ गमन केले होते. परंतू ज्या कृष्णभक्तिचे आपण वर्णन करीत आहोत ती अत्यंत दुर्लभ आणि सहजसुलभ प्राप्त होणारी नाही. श्रील रघुनाथदासगोस्वामींनी आपल्या हृदगत विरह विलासरुपी कुसुमांच्या अंजलीस श्रीराधाजींच्या चरणी भेट केले, ज्यास “विलाप- कुसुमांजली” नावाने जाणले जाते. ते आपल्या सिद्ध स्वरुपात श्रीराधिकेच्या चरण सेवेची प्रार्थना करतांना म्हणतात- “हे राधे! मी कधी तुमचे गृहमार्जन करण्याच्या सेवेची सुसंधी प्राप्त करु शकेन?” त्यांच्या अशा प्रार्थना होत्या. असेच भक्त वास्तविक साधक आहेत.
श्रवणं, किर्त्तनं, विष्णुस्मरणं- येथे आपल्याकरिता विष्णुस्मरणाचा काय अर्थ आहे? राधाजींचे स्मरण, श्रीराधाकृष्णाच्या लीला हेच माझे एकमात्र भूषण आहे. मी त्यांच्याअतिरिक्त आणखी काहीच ऐकू शकत नाही. मला वैकुंठी जाण्याचीदेखील अभिलाषा नाही. आपल्या जीवन निर्वाहाकरीता भाकरीचा एक तुकडा ग्रहण करीत मी सदैव, वृंदावन, राधाकुंड येथे वास करीन. माझे केवळ शरीर हे स्थान सोडेन, पण माझे प्राण नाही! त्यांची धामनिष्ठा अशी होती.
भगवंताच्या सेवेच्या प्राप्तिची तीव्र उत्कंठा साधनेकरीता अत्यंत आवश्यक असते. ज्यांच्यात अशी उक्तंठा आहे असे भक्त वास्तविक साधक आहेत. किंतु आपण कुठे आहोत, काय आहोत? आपण

भक्तिच्या प्रथम सोपानावरच श्रवण तथा कीर्त्तन करत आहोत.
निष्ठेनुसार भक्ति दोन प्रकारची असते, निष्ठिता भक्ति आणि अनिष्ठिता भक्ति. सध्या आपले साधन अनिष्ठिता भक्तिअंतर्गत होत आहे. कारण अजून आपल्या बुद्धित स्थिरता आलेली नाही. काहीजण विचार करतात "मी घरातच राहून भजन करीत आपल्या वृद्ध मात्या-पित्यांची देखरेख व सेवा करीत राहीन. कुणी विचार करते- मी असे ऐकले आहे की गृहस्थ जीवन एका नरककुपाप्रमाणे असते म्हणून मी हे सोडून एका आश्रमात जाऊन राहीन. किंतू अर्जुन, श्रीवास आचार्य आणि गोपी हे सगळेच उच्च भक्त होते तथा ते गृहस्थ होते म्हणून मलासुद्धा गृहस्थच रहावयास हवे. परंतू नारदजी, शुकदेवजी, गोस्वामीवर्ग तथा श्री चैतन्यमहाप्रभू या सगळ्यांनी गृहस्थ जीवनाला अंधकुप समजून सोडून दिले. ते घरात भजन नाही करु शकले. मग मी काय करु? बरे मी काही दिवस येथे राहून मग याचा त्याग करीन. नको, नको मला लगेचच निघून जायला हवे." अशा प्रकारे अनिश्चित अवस्थेतल्या दुविधेत आपण सतत असतो. आपली भक्ति अनिष्ठिता आहे. आपल्याला आपल्या बुद्धिस निश्चल करुन निष्ठेच्या स्थितीपर्यंत यायला हवे, पोहोचायला हवे.
निष्कपट रुपाने हरिनाम करता-करता, तसेच हरिकथा श्रवण करता करता साधकास प्रतिष्ठा प्राप्त होऊ लागते, तथा मुक्ती हात जोडून मागे उभी राहून विनंती करते की-

मुक्ति स्वयं मुकुलितांजलि.......(कृष्ण-कर्णामृत-१०८)

"हे प्रभो! काय मी आपली कुठल्याप्रकारे सेवा करु शकते का?" आठ प्रकारच्या सिद्धी-योग सिद्धी आपापल्या सेवा प्रदान करण्यास उत्सुक असतात; प्रस्तुत असतात.
निष्ठा प्राप्त केल्यानंतरच आपण आपले मन कृष्णांत लावू शकतो; परंतू काही-काही अनर्थ तरीसुद्धा राहून जातात. आपले पूर्व-पूर्व कर्म मग ते पाप असो वा पुण्य, त्यांच्या प्रतिक्रिया तर होतच असतात. आपण

कर्ममिश्रा भक्तिसुद्धा करु शकतो, ज्यांत अनेक कामनांच्या पूर्तिची इच्छा असते, त्याचे फळदेखील प्राप्त होते. या संसारातील व्यक्ती ज्या अलभ्य वस्तुंच्या कामनापूर्ती करिता कठिण प्रयत्न करित असतात त्या आपल्याला सहजसुलभपणे उपलब्ध होतात. प्रचूर प्रतिष्ठा प्राप्त होते आणि आपण तिच्या सुखात सुगमतेने डुंबुन जातो. म्हणून यापासून सावधान रहा.

अनर्थ चार प्रकारचे असतात- भक्ति उत्थ अनर्थ, पूर्व पापांतून उदित होणारे दुष्कृति उत्य अनर्थ, पूर्व पुण्यांतून उदित होणारे सुकृति उत्थ अनर्थ आणि अपराधांतून उदय पावणारे अनर्थ.

अथवा जर आपण कुणा वैष्णवाच्या चरणी अपराध करुन बसलो तर त्याची देखील प्रतिक्रीया अवश्य होणारच.

याचारही प्रकारच्या अनर्थांना दूर सारित आपण आपल्या साधनेत पुढे सरकायला हवे. क्रमशः आपली निष्ठा रुचित तथा आसक्तित परिवर्तित होऊन जाईल. आसक्तिच्या दशेत आपणास आपल्या भजनात पूर्ण आसक्ति निर्माण होईल.

गुरौ गोष्ठे गोष्ठालयिषु सुजने भसुरगणे
स्वमंत्रे श्रीनाम्नि व्रजनवयुवद्वन्द्वशरणे।
सदा दम्भं हित्वा कुरु रतिमपूर्वमतिवरा-
मये स्वान्तर्भ्रातश्चदुभिरयाचे धृतपदः।। (मनःशिक्षा-१)

हे माझ्या अबोध अंतःकरणा! मत्प्रिय भ्राता मना! मी तुझ्या चरणांना पकडून नम्रतापूर्वक प्रिय वचनांद्वारे ही प्रार्थना करतो की तु सर्वतोभावेन दंभाचा परित्याग करुन आपल्या श्रीगुरुदेवांच्या, श्रीव्रजधामाच्या, श्रीव्रजवासीजनांच्या, श्रीवैष्णवजनांच्या, भुसुर (ब्राह्मण) जनांच्या, श्रीभगवन्नामाच्या तथा व्रजच्या नित्य नवीन किशोर-किशोरी श्रीश्रीराधा-कृष्ण युगल शरणी शीघ्रपणे नैरन्तर्यमयी लोकोत्तर रति प्राप्त करो.

आपणास भजन आणि भजनीय दोघांमध्येही निष्ठा आणि आसक्ति असावयास हवी. श्रवणं-कित्र्तनं आदि भजन आहे तथा श्रीराधाकृष्ण आपले भजनीय आहेत. जेंव्हा आपली रुचि या दोहोंकरता परिपक्व होते तेव्हा आसक्तिची स्थिती उत्पन्न होते. त्यानंतर भगवंताच्या दयेने हृदय स्थिर होते. या अवस्था मद्-भक्तांच्या अंतर्गत आहेत.

श्रीभगवान् कशा प्रकारे आपल्या भक्तांचे योगक्षेम वहन करितात याबद्दलची एक सत्यघटना पुढे विदित आहे: -

अर्जुन मिश्र नामक एक दरिद्र ब्राह्मण होते, परंतू ते परम भगवद्भक्त होते. त्यांनी श्रीमद्भवद्गीतेची टीका लिहायला घेतली होती. ते नित्यप्रती प्रातःकाळी भजनकार्य उरकून एक प्रहर दिवस चढेपर्यंत श्रीगीतेची टीका लिहीत असत. त्यानंतर ते भिक्षेकरीता बाहेर जात असत. भिक्षेमध्ये जे काही प्राप्त होत असे ते पत्नीसमोर आणून ठेवित असत.

ती मोठ्या प्रेमाने रंधन करीत असे; भगवंताला नैवेद्य अर्पण करुन स्वामीस महाप्रसाद भोजन करवीत असे आणि जे काही उरत असे ते संतुष्ट चित्ताने स्वतः ग्रहण करीत असे. त्यांचे सगळेच वस्त्र जुने-जीर्ण आणि फाटके होते. केवळ एक धोतरच थोड्या चांगल्या अवस्थेत होते जे बाहेर घालण्यास उपयुक्त होते. जेव्हा ब्राह्मण ते घालून भिक्षेकरीता बाहेर जात असत, त्यावेळी ब्राह्मणी चिंध्यांनी आपले अंग झाकून लज्जा निवारण करीत असे. स्वामी जेव्हा भिक्षेहून परतत, तेव्हा ब्राह्मणी ते धोतर परिधान करुन बाहेर येत असे आणि गृहकार्य संपन्न करीत असे. तरीदेखील दारिद्र्याला भगवंताची देणगी समजून दोघेही सर्वदा संतुष्ट रहात असत. ‘गृहदेवता श्रीगोपीनाथजी कृपाकरुन जी काही भिक्षा देतात, त्या भिक्षेस त्यांनाच निवेदन करुन महाप्रसाद घ्यावा’- सर्वदा त्यांची अशीच भावना होती. अशाप्रकारे त्यांचे दिवस आनंदात चालले होते. सांसारिक दुःख-कष्टांनी ते जरादेखील विचलित होत नसत. अशाप्रकारे नित्यनेमाने गीतेची टीका लिहीली जात होती. एक दिवस ब्राह्मण भजनातून निवृत्त होऊन टीका लिहीण्यास बसले.

'अनन्याश्चिंतयतो मां........... नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्' (गीता ९/२२) या श्लोकाची टीका लिहावयाची होती. श्लोक वाचतांना एक जटील समस्या उत्पन्न झाली. ते कुठल्याही प्रकारे त्याचे समाधान करु शकले नाही. जे स्वयं भगवान् आहेत, जे संपूर्ण विश्व-ब्रह्मांडाचे एकमात्र अधीश्वर आहेत, ते स्वतः आपले अनन्य भावाने भजन करणाऱ्या व्यक्तिंचे योग-क्षेम स्वतः कसे काय वहन करतील? नाही, हे कदापि संभव नाही. जर हे सत्य असेल तर माझी ही अशी अवस्था का बरे आहे? मी तर अनन्य भावनेने केवळ त्यांचाच भरवसा करतो, मी माझे यथासर्वस्व त्यांच्याच चरणी अर्पण केले आहे तरीसुद्धा मला असे दुःख-दारिद्र्य का भोगावे लागत आहे? तेव्हा 'नित्याभियुक्तांना योगक्षेमं वहाम्यहम्' भगवंताच्या मुखारविंदातून निघालेले वाक्य नाही, तर प्रक्षिप्त (नंतर कुणीतरी जोडलेले) असावे. ते आपल्या बुद्धीने हा गुंता सोडवण्याचा जितका प्रयत्न करीत तितके अधिक त्यांत गुंतून जात. हळू-हळू त्यांचा संदेह वाढू लागला. शेवटी त्यांनी त्या ओळींवर लाल शाईने तीन रेखांनी काट मारुन ग्रंथ लिहीणे थांबविले आणि ते भिक्षेकरीता निघाले.

येथे करुणामय प्रणतपाल भगवंताने पाहिले की माझ्या भक्ताच्या मनात माझ्या वचनांप्रती संदेह उत्पन्न झाला आहे. तेव्हा त्यांनी अति मनोहर सुकुमार श्याम वर्णाच्या बालकाचा वेश धारण केला. दोन टोपल्यांमध्ये प्रचूर तांदुळ, डाळ, भाज्या, तूप, इत्यादी सामान भरुन ते स्वतःच्या खांद्यावर वहन करीत मिश्रजींच्या द्वारी पोहोचले. दरवाजा आतून बंद होता. आधी त्यांनी दरवाजा जोरजोरात वाजविला आणि मग जोरजोरात पुकारु लागले- "माते! माते!" बिचाऱ्या ब्राह्मणीकडे परिधान करायला वस्त्रच नव्हते. चिंधड्या लपेटून कुणासमोर जाणार तरी कसे? लज्जावशतः ती शांत बसून राहिली. परंतू, दरवाज्याच्या खटखटवण्याचा आणि बोलावण्याचा आवाज क्रमशः वाढतच गेला. शेवटी लाचार होत तिने दरवाजा उघडला. बालक ओझे घेऊन आत आले आणि ते अंगणात

उतरवून बाजूला जाऊन उभे राहिले. ब्राह्मणी लाडेने मुख खाली करीत घरात निघून गेली. बालक वेशधारी भगवान् ब्राह्मणीला म्हणाले- “माते! पंडितजींनी (मिश्रजी) मला ही शिधा (भोजनाची कच्ची सामुग्री) घेऊन पाठविले आहे. आपण हे सर्व घेऊन जा.”

ब्राह्मणी आत्तापर्यंत घरात शरमेने मान खाली घालून उभी होती. बालकाचे मधूर शब्द ऐकून तिने अंगणात पाहिले तर मोठ्या मोठ्या दोन टोपल्या भरुन खाद्य-द्रव्यें भरली होती. इतकी भोजन सामुग्री त्यांनी आपल्या जीवनकाळात कधीच पाहिली नव्हती. मुलाने वारंवार सांगितल्यानंतर ती एक-एक करुन वस्तू घरांत नेवून ठेवतांना एकसारखी तिची नजर बालकाच्या मुखारविंदाला न्याहाळत होती. बालकाचे सुंदर मुखमंडळ पाहून ती थक्क झाली. अहाहा! किती सुंदर मुख आहे! श्याम वर्णात इतके अलौकिक सौंदर्य असू शकते- याची जीवनात कधी कल्पनाच केली नव्हती! ती मंतरल्यागत- बघतच राहिली. बघता- बघता तिची दृष्टी बालकाच्या वक्षस्थळावर पडली. तिने पाहिले की त्याच्या छातीवर तीन मोठे-मोठे डाग पडले आहेत; जसे काही आत्ताच कुणीतरी धारदार शस्त्राने वार केलाय आणि रक्त निघालेय. ती आतूर होऊन म्हणाली, “बेटा! तुझे वक्षस्थळ असे निर्ममपणए कुणी चिरले? हाय हाय! इतक्या सुकोमल अंगावर आघात करतांना पाषण हृदय देखील विरघळून जाईल.” बालक वेशधारी श्रीकृष्ण म्हणाले- “माते! मला शीधा आणण्यास थोडा वेळ लागला, म्हणून मिश्रजींनी स्वतः माझ्या छातीवर वार केलेत.”

“हाय हाय! त्यांनी तुझ्या छातीवर वार केले?” ब्राह्मणीचे डोळे भरुन आले- “अच्छा, घरी तर येऊ दे त्यांना मग विचारते की तुझ्या सुकोमल अंगावर त्यांनी किती निष्ठूर होऊन हात उचललाय ते? बेटा! दुःख करु नकोस. थोडा वेळ थांब, मी आत्ता स्वंयंपाक करते. तू ठाकुरजींचा प्रसाद घेऊनच जा.”

ब्राह्मणीने बालकाला अंगणात बसविले आणि ती स्वयंपाक घरात जाऊन आपल्या कामात व्यस्त झाली. इकडे भगवंताने विचार केला, “ज्या उद्देशाकरीता मी या सर्व वस्तूंचे स्वयं वहन करीत इथपर्यंत घेऊन आलो, ते कार्य पूर्ण झाले. ब्राह्मण आता घरी आल्यावर हातोहात माझ्या वचनांतील सत्यतेचे प्रमाण प्राप्त करतीलच. त्यांना पुन्हा कधी माझ्या वचनांवर अविश्वास वा संदेह होणार नाही.” अशा प्रकारे भक्ताचा संदेह दूर करण्याची व्यवस्था करून ते तत्क्षण अंतर्धान पावले.

इकडे ब्राह्मणाला आज खूप यत्न करुनही काहीच भिक्षा मिळाली नाही. ते निराश होऊन घरी परतले. विचार केला- “ठाकुरजींची अशीच इच्छा दिसतेय.” दरवाजा ठोठवल्याबरोबर ब्राह्मणीने दरवाजा उघडला. घरात प्रवेश करताच पत्नीला रंधन करतांना पाहून म्हणाले- “स्वयंपाकाची तयारी तर करतेस पण आज काही भिक्षाच नाही मिळाली. काय बनवणार आहेस?”

“का? थोड्यावेळापूर्वीच तर आपण त्या बालकाच्या हाती इतकी सगळी पाठविलीत ती! आपण दोघे ती सहा महिने सुद्धा संपवू शकणार नाही. मग ‘स्वयंपाक काय करतेस’- असे का विचारताय?- ब्राह्मणीला थोडे आश्चर्य वाटले.” परंतू आपले हृदय पाषणासारखे इतके कठोर असेल असे मला कधीच वाटले नव्हते. या निष्पाप बालकाच्या सुकोमल अंगावर आपण किती निर्ममपणे आघात केलेत? थोडीसुद्धा दया नाही आली? त्याची छाती चिरल्याने लाल-लाल असे तीन डाग झालेत, वाटते आत्ता रक्त वाहू लागेल.”

मिश्राजींना आश्चर्याचा धक्काच बसला. त्यांनी विचारले- “असे झालेय तरी काय? सरळ सरळ सांग तरी! मी कुठलेच सामानही पाठविले नाही की कुठल्याही बालकाला मारलेलेही नाही. मला तर काही कळेनासेच झालेय.”

ब्राह्मणीने पतिदेवांचे बोलणे ऐकून त्यांना घरात ठेवलेले, तांदुळ, डाळ, पीठ, आदि वस्तू दाखविल्या आणि अंगणात बसलेल्या बालकाच्या

वक्षस्थळावर चिरलेल्या डागांच्या खुणा दाखविण्याकरीता त्यांना बरोबर घेऊन अंगणात आली. बघते तर तेथे बालकच नव्हते. कुठे गेला? इकडे-तिकडे शोधले, बाहेरचा दरवाजा तर पूर्ववत् बंद होता. दोघेही आश्चर्यचकित होऊन एकमेकांकडे पाहू लागले. मिश्रजींना आता काहीच समजणे बाकी राहिले नाही. त्यांच्या डोळ्यांतून अविरत अश्रूधारा प्रवाहित होऊ लागल्या. तरीसुद्धा उरलासुरला संदेह दूर करण्याकरता हात-पा धुवून ठाकुरजींच्या घरात गेले आणि गीता-ग्रंथ उघडून पाहिला- आज सकाळी त्यांनी लाल शाईने ज्या तीन रेखांनी “नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्” या वाक्याला काट मारली होती, आता त्या तिन्हीही रेखा तेथे नव्हत्या. ते आनंदाने गदगद होऊन देवघरातून बाहेर पडले आणि रडत-रडत पत्नीला म्हणाले- “प्रिये! तू धन्य आहेस, आज तुला गोपीनाथजींचे साक्षात् दर्शन घडले. हे सगळे सामान ते स्वतः घेऊन आले. मला इतकी शिधा कोण देणार? आज सकाळी गीतेची टीका लिहीतांना मला भगवंताच्या वाणीवर संदेह झाला होता. मी संदेहयुक्त अंशाला लाल शाईने तीन रेखांनी काट मारली होती. त्यामुळेच आपल्या गोपीनाथजींचे सुकोमल वक्षःस्थळ चिरले. ते परम करुणामय आहेत. त्यांनी आपल्या वाणीची सत्यता प्रमाणित करुन माझ्यासारख्या नास्तिकाचा संदेह दूर करण्याकरीता किती कष्ट घेतलेत.”
ते पुढे बोलूच शकले नाहीत, गळा अवरुद्ध झाला. ते प्रेमविभोर होत ‘हा गोपीनाथ! हा गोपीनाथ!!’ म्हणत कोसळले. ब्राह्मणी गोपीनाथासमोर शुद्ध हरविल्यागत स्तब्ध उभी राहिली. तिचे देखील डोळे भरुन आले. थोड्यावेळाने ब्राह्मणाला चेतना आली. त्यांनी स्नानादि नित्य क्रिया संपन्न करुन गोपीनाथजींना भोग लावला आणि परमप्रितीने दोघांनी महाप्रसाद घेतला. मग ते नियमित रुपाने गीतेची टीका लिहू लागले. त्यांचे जीवन अत्यंत प्रेममय होऊन गेले.
हीच भक्ती आहे तथा त्या साधनेचे उदाहरण आहे ज्याद्वारे भक्ति उदित होते. अर्जुन म्हणाला- “प्रभो! येथे या रणभूमित असे करणे

अत्यंत कठीण आहे. मी मन्मना भव नाही होऊ शकत तथा मद्भक्तो सुद्धा नाही करु शकत. आपण कृपा करुन मला तो उपाय सांगा जो साधा असेल, सरळ असेल."

श्रीभगवान् म्हणाले- "मद् याजि"- माझी पूजा करा.

## चतुर्थ परिच्छेद

सर्वगुह्यतमं भूयः श्रृणु मे परमं वचः।
इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम्।।
मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।
मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे।। (गीता १८/६४,६५)

"सर्वांपेक्षा अत्यंत गोपनीय असे माझे परमवाक्य पुनः श्रवण करा. तु माझा अत्यंत प्रिय आहेस, तेव्हा असे जाणून तुझ्या हिताकरिताच सांगत आहे." तु माझ्यांत तुझ्या चित्ताचे समर्पण कर, माझ्या नाम-रुप-लीला आदिंचे श्रवण-कीर्त्तन परायण होऊन माझा भक्त बन आणि मला नमस्कार कर. अशाप्रकारे तु मलाच प्राप्त करशील. मी तुझ्याकडे अशी सत्य प्रतिज्ञा करतो, कारण तू माझा प्रिय आहेस.

येथे 'परमं' शब्दाचा काय अर्थ आहे? 'परमं' अर्थात् अत्यंत गोपनीय परम वाक्य, सर्व शास्त्रांचे सर्वोपरि सार आहे. या परम वाक्याला तेव्हाच जाणले जाऊ शकते, जेव्हा व्यक्ति काय, मनो, वाक्याद्वारे गुरु तथा भगवंताच्या शरणी जाते, अन्यथा या सत्यास कृष्ण प्रकाशित करीत नाहित. गुरुच्या निकट शरणागत होण्याची विधी भगव्दगीतेत सांगितली आहे.

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।
उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिनः।। (गीता ४/३४)

ज्ञानाचा उपदेश देणाऱ्या गुरुकडे दंडवत प्रणाम कर, संगत प्रश्नाद्वारे आणि सेवेद्वारे त्या ज्ञानाला समजावून घ्या. तत्त्वदर्शी ज्ञानीगण तुला उपदेश

देतील. जो आपल्या गुरुला निष्कपट रुपाने प्रणिपात, परिप्रश्न तथा सेवेद्वारे प्रसन्न करोत, तोच या ज्ञानाला समजण्याचा अधिकारी असतो. जर कुणी गुरुच्या निकट जाऊन आपल्या प्रश्नांच्या उत्तरांची पृच्छा करतो अथवा उत्तराला ध्यानपूर्वक नाही ऐकत, पुनः विचारतात तेव्हा गुरु त्याला केवळ बाह्य उपदेश देतील किंतू सर्वगुह्यतम उपदेश नाही देणार. याचाच विचार करुन कृष्णाने प्रतिज्ञा केली की ज्याचे हृदय तपस्येद्वारे शुद्ध झालेले नाही, त्याला गीतेचा उपदेश देऊ नये. गुरु वैष्णवांची सेवा केलेली नाही, त्याला गीतेचा उपदेश देऊ नये. सर्वप्रथम कृष्णाने अर्जुनाला निष्काम कर्माचा उपदेश दिला-

यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः।
तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंग समाचर।। (गीता ३/९)

हे कुंतीनंदन! श्रीविष्णुला अर्पित निष्काम कर्मा अतिरिक्त अन्य कर्मांद्वारे मनुष्यास कर्मबंधन प्राप्त होते. तेव्हा तू फलाकांक्षारहित होऊन भगवान् विष्णुंच्या उद्देशाने कर्माचे योग्य ते आचरण कर.

आत्तापर्यंत कृष्णाने आपले चरम स्वरुप प्रकाशित केले नव्हते. ते परमात्म्याकडेच प्रवृत्त होण्याचा सल्ला देत आहेत. मग गीतेच्या शेवटी ते मन्मना भव श्लोकाची अवतारणा करीत आहेत. जेव्हा ते म्हणतात, सर्वदा माझेच ध्यान करा तेव्हा ते आपल्या श्यामसुंदर स्वरुपास रंगित करतात. ज्यांचे काळे कुरळे केस खूप सुंदर दिसतात, तसेच ज्यांनी आपल्या मस्तकावर मोरपंख धारण केले आहे, जे वृंदावनात कदंब वृक्षाखाली बनलेल्या कुंजात आपल्या त्रिभंग ललित मुद्रेत उभे आहेत, त्यांच्या सुंदर अधरांवर वंशी विरोजित आहे तथा तिच्या छिद्रांतून आपल्या हृदयातील अमृत बरसते आहे. आपणांस कृष्णाच्या याच रुपाचे ध्यान करावयास हवे. या श्लोकापूर्वी कृष्णाने आपल्या या रुपास गीतेत प्रकाशित केलेले नाही. 'मन्मना भव' ची व्याख्या आपण गोपींच्या उदाहरणाद्वारे केली आहे.

'मद्भक्तो' च्या संबंधात श्रवण, कित्र्तन तथा स्मरणाविषयी सांगितले तथा हे पाहिले की उच्चकोटीच्या काही भक्तांनी गोस्वामी शास्त्रांच्या अनुशीलनाद्वारे आपले साधन करीत भगवत् प्राप्ती केली.

भाव दशेत 'मन्मना भव' आंशिक रुपाने संभव आहे, केवळ प्रेम दशेतच कृष्णाचे निरंतर स्मरण होते. भक्त बनण्याच्या प्रक्रियेत (मद्भक्तो) सर्वप्रथम श्रद्धेने क्रमशः निष्ठा, रुचि, आसक्ति तथा अंततः भाव उदय होतो. या स्थितीतच साधक भक्त बनतो तथा कृष्णाविषयी चिंतन करतो.

यानंतर कृष्ण म्हणतात 'मद्याजि' याजि चा अर्थ आहे यज्ञ. जर कुणाला भगवंताशी प्रेम झाले नाही, केवळ अल्प श्रद्धा मात्र आहे तर त्यास यज्ञ करावयास हवा, कारण यज्ञ सांसारिक बंधनाची चिकित्सा आहे. या विषयीचा संबंधित श्लोक श्री चैतन्य महाप्रभू तथा राय-रामानंद संवादात सापडतो. (चै.च.मध्य.८.६९). श्री विग्रह पूजा षोडशोपचारांद्वारे वा द्वादशोपचारांद्वारे करता येते, परंतू जर पूजेत प्रेम नाही तर भघवान संतुष्ट होत नाहित. जेव्हा तहान आणि भूक लागते तेव्हाच भोजन आणि जल स्वादिष्ट लागतात, भूक नसेल तर कुणी स्वादिष्ट भोजन प्रस्तुत केले तरी ते रुचकर लागत नाही; त्यात मीठ कमी अधिक असेल, तथा अनेक दोष दृष्टिगत होतात. परंतू जर भूक असेल तर शिळी भाकरी सुद्धा पाणी आणि मीठासोबत गोड लागेल. अशाप्रकारे जर साधकात प्रेम नसेल तर भगवंतालाही भूक लागत नाही तथा ते त्या व्यक्तिच्या अर्चनेने प्रसन्न होत नाही. भक्ताच्या प्रेमाने भूक लागल्यावर भगवान् हा विचार करीत नाहीत की माझी पूजा षोडशोपचारांद्वारे होतेय वा केवळ एकाद्वारे. भक्ताच्या हृदयातील प्रेमच भगवंतात भूक उत्पन्न करते तथा ते म्हणतात-

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः।। (गीता- ९.२६)

जो भक्तिपूर्वक मला पत्र, पुष्प, फलादि प्रदान करतो, मी त्या शुद्धचित्त भक्तांच्याद्वारे भक्तिपूर्वक प्रदत्त त्या समस्त वस्तुंचे ग्रहण करतो.

येथे एक गोष्ट समजून घेणे आवश्यक आहे, आपण असा विचार करता कामा नये की हे निवदेन भगवंताच्या प्रसन्नतेकरिता का आहे? अंततः तर हे सगळे आपल्याकरिताच, आपल्या सुखाकरिताच आहे.

स वै पुंसां परो धर्मो यतो भक्तिरधोक्षजे।
अहैतुक्यप्रतिहता ययाऽऽत्मा संम्प्रसीददति।। (श्रीभा.१२.६)

इंद्रीय ज्ञानाच्याही पलिकडे मनुष्याकरिता सर्वश्रेष्ठ धर्म तोच आहे, ज्यायोगे श्रीकृष्णाची भक्ति होते- भक्तिही अशी, ज्यात कुठल्याही प्रकारची वासना नसते आणि जी नित्यनिरंतर टिकून रहाते. अशा भक्तिमुळे ह्रदय आनंद स्वरुप भगवंताची उपलब्धि करुन, कृतकृत्य होऊन जाते. अशा भक्तिच्या योगे अनर्थ दूर होतात आणि आत्मा प्रसन्न होतो.
या श्लोकाचे अंतिम चरण आहे ‘ययात्मा सम्प्रसीददति’- याचा अर्थ हा लावता कामा नये की ते आपल्या सुख आणि संतोषास रंगित करीत आहे. त्या वेळेस ते आपल्या उपभोगाची इच्छा वा ‘काम’ बनून जाते. येथे आत्म्याचे तात्पर्य स्वतःशी नाही तर अधोक्षज भगवंताची भक्ती करण्याशी आहे. भगवान् श्रीकृष्णाची प्रसन्नताच प्रधान आहे. जर ते संतुष्ट झाले तर आपली पूजा सार्थ आहे. जर कुठले कर्म आपल्या प्रसन्नतेकरिता केले जात असेल तर समजायला हवे की हे आपल्या कामना-वासना पूर्तिकरिता केले जात आहे. जर भगवान प्रसन्न झाले तर जीवाला स्वतःलासुद्धा ही प्रसन्नता प्राप्त होते. किंतू जर आपण आपल्या स्वार्थाकरिता पूजा करता तर ती सकाम भक्ती आहे. हे जाणून घेणे अतिआवश्यक आहे की आपल्या सुखाच्या अभिलाषेने युक्त अर्चन विशुद्ध अर्चन नाही. अधिकांश गृहस्थ पूजाअर्चना करतांना म्हणतात- “प्रभू, मी आपल्या समस्त कर्मांची फळे आपल्या चरणी अर्पण करतो.” परंतू वास्तवात ते त्यांच्या परिवाराच्या सुखशांती करिता असते. आपणांस या कामनांसहित पूजाअर्चना करणे वर्ज्य करावयास हवे. श्रीमद्भागवतात पृथु महाराजांची कथा उचित रुपाने अर्चन करण्याची विधी सांगते.

मद्याजीचे ताप्तर्य आहे- माझे अर्चन करा. अर्चन करणाऱ्याची निष्ठा कशी असायला हवी, याकरिता मी आपल्या अनुभवाची गोष्ट सांगतो, जी या मथुरेचीच घटना आहे. यद्यपि अर्चनेची निष्ठासुद्धा साधारणतया संभव नाही, परंतू 'मद्भक्तो भव' च्या निष्ठेपेक्षा थोडी निम्न स्तरावरील आहे. म्हणून भगवान् म्हणतात- जर बिल्वमंगलप्रमाणे माझे भक्त नाही बनू शकत, तर माझे अर्चन करा. घटना अशी आहे :- मथुरेत एक बाबा रहात होते, जे शाळिग्राम शीळेचे निष्ठापूर्वक अर्चन करीत असत. अर्चनविधिच्या विभिन्न अंगाचे त्यांना पूर्णज्ञान नव्हते, परंतू जे काही करीत, निष्ठापूर्वक करीत असत. त्यांनी प्रतिज्ञा केली होती की ब्राह्ममुहूर्ताला उठून यमुनेत स्नान करुन यमुनाजळानेच मी शाळीग्राम शीळेचे अर्चन करीन.

एकदा काय झाले, माघ महिन्याच्या अमावस्येची रात्र होती, घनघओर अंधार दाटला होता, त्यातच रात्रभर पाऊस पडत होता, आणि सोसाट्याचा वारा सुटला होता. आकाशात चांदणं नसल्यामुळे त्यांना वेळ काय झाली असावी याचा अंदाज नाही आला आणि ब्राह्ममुहूर्ताआधीच उठून यमुनास्नानाकरीता निघाले. यमुनेचे पाणी बर्फासारखे थंड होते. अतिथंडीमुळे त्यांचे हाल होत होते, तरिसुद्धा आपल्या नियमाच्या रक्षेकरीता ते यमुनेत स्नान करुन ठाकुरजींकरीता जळ घेऊन निघाले. जेव्हा ते परतत होते तेव्हा दाट काळोख, पाऊस आणि शारीरिक अस्वास्थ्यामुळे त्यांना खूप त्रास होत होता. त्यांना खूप चिंता वाटू लागली की मी आता घरी जाऊन ठाकुरजींची सेवा कशी करणार? इतक्यात त्यांनी पाहिले की समोरुन कुणीतरी कंदील घेऊन येत आहे. जेव्हा ते जवळ गेले तेव्हा पाहिले की ते एक बालक होते. मुलाने पावसापासून बचाव होण्यासाठी डोक्यावरुन घोंगडे पांघरले होते. अगदी जवळ गेल्यावर बालकाने विचारले, "बाबा! आपण कोठे जाणार?" बाबांनी पत्ता सांगितला, तसे बालक म्हणाले, "मी सुद्धा तिकडेच चाललोय, तुम्ही माझ्याबरोबर चला मी तुम्हाला तुमच्या घरापर्यंत सोडतो." बाबा त्या बालकाबरोबर चालू लागले. चालता चालता कधी घरी आले त्यांना कळलेच नाही. जेव्हा ते घरांत जाऊ लागले तेव्हा त्यांच्या मनात विचार आला की

मुलाचे नाव तरी विचारायला हवे. परंतू हे काय! लांबपर्यंत तो मुलगा कुठेच दिसत नव्हता! ते तिथेच स्थितप्रज्ञासारखे जडवत् उभे राहिले आणि विचार करु लागले, "अरेरे! माझ्या वचनाच्या रक्षणाकरीता स्वयं छलियाच बालकाच्या रुपात आला आणि मला चकवून निघून देखील गेला."

हे आहे अर्चन, आपला निश्चय देखील असाच दृढ असायला हवा. आपल्या सुख-दुःखाचा विचार भगवंताच्या सेवेआड येता कामा नये. हीच वास्तविक तृष्णा आहे आणि जर आपण अशा प्रकारे सतृष्ण होऊन अशा प्रेमाने पूजा-अर्चना केली तर भगवान् आपला अवश्य स्वीकार करतील. म्हणून कृष्ण म्हणतात- 'प्रयतात्मनः' (गीता ९.२६). जर कुणी श्रद्धा-प्रेमपूर्वक भगवंताला निष्कपट रुपाने काही अर्पण करीत असेल तर ते त्याचा अवश्य स्वीकार करतील. अशाच प्रकारे गुरुसेवेत जर श्रीगुरुदेव आपणांस कुठल्याही चुकीकरीता ओरडत असतील तर आपण त्या गोष्टीचा पराचा कावळा करीत विचार करतो, "गुरुजी तर माझ्याशी अत्यंत स्नेहशील होते, पण आता माझ्याशी कित्ती कठोर वागतात! मी आता त्यांना सोडून जाईन." आपला असा विचार करणे अत्यंत चुकीचे आहे, तथा आपण असा विचार करुच नये. गुरुसेवा करतांना आपल्या समक्ष अनेक बाधा आपली परीक्षा घेण्यासाठी येतील-येतात; परंतू आपला निश्चय दृढ असावयास हवा की जन्म-जन्मांतरपर्यंत मी माझ्या गुरुंना किंवा प्रभूला सोडणार नाही.

पूजा अर्जनेविषयी आणखी एक कथा आहे. एक ब्राह्मण होता, जो विग्रहसेवा करित असे तथा पूजेनंतर प्रतिदिन नैवेद्य लावीत असे. या कार्यकरिता त्याला वेतन मिळत असे. वेतन नाही मिळाले तर तो पूजाही करित नसे. अशा अवस्थेत त्याचे भगवंतावर यथार्थ प्रेम होतेच कोठे? बिहार आणि बंगालमध्ये असे अनेक व्यवसायिक पुजारी आहेत, जे घरोघरी जातात. जे पूजेच्या बदल्यात शीधा घेतात, जसे तांदुळ, पीठ, डाळ, भाज्या, कपडे इ. ही सगळी शीधा ते विग्रहांना दाखवितात आणि मग सगळे सामान बांधून आपल्या घरी घेऊन जातात. रोज ते पूजाअर्चना करण्यासाठी बऱ्याच घरी जातात आणि दिवस संपतांना आपली कमाई मोजत घरी परततात.

बा ब्राह्मणसुद्धा वेतन प्राप्त झाल्यावरच पूजा करित असे. एकदा काही दिवसांकरिता तो नगराबाहेर जाणार होता. त्याने अत्यंत स्नेहपूर्वक आपल्या पुत्रास जवळ बोलाविले आणि म्हटले, “माझ्या प्रिय पुत्रा! ठाकुरजींना स्नान करविल्यानंतर प्रतिदिन भोग (नैवेद्य) लावित जा.” त्या पुत्राने पूजेविषयी काहीच ज्ञान अर्जित केलेले नव्हते, परंतु तरीही तो म्हणाला, “ठीक आहे, तुम्ही जसे सांगत आहात, मी तसेच करीन.” दुसऱ्या दिवशी त्याची आई भाजी, चपाती इ. बनवित होती, बालकाने ठाकुरजींना गंगाजळाने स्नान करविले, तुलसीदल अर्पण केले आणि सिंहासनावर आसनस्थ केले. नंतर तुलसीपत्र ठेवित भाजी-चपातीचा भोग लावतांना म्हटले, “ठाकुरजी, आपण आपले भोजन ग्रहण करा, तुम्ही खा, तोपर्यंत मी इथेच थांबतो.” तो थोडावेळ थांबला. मग उत्सुक होत म्हणाला, “ठाकुरजी, मी जवळ-जवळ अर्ध्या तासांपासून ताटकळत उभा आहे आणि तुमच्या ताटाकडे पहातो आहे. परंतू आपण काहीच खात नाही आहात. माझे पिता येथे नाहीत, म्हणून आपण उपाशी रहाणार का? जोपर्यंत आपण खाणार नाही, तोपर्यंत मी ही मुळीच खाणार नाही.” तो अत्यंत प्रेमाने आणि निष्कपटतेने हे बोलत होता. जर हरिनाम जप करतांना अशी भावना आपल्या हृदयात नसेल तर मंत्राचा प्रभाव होत नाही. जर आपण ठाकुरजींची सेवा अशा भावनेने केली नाही तर ते आपली सेवा का स्वीकार करतील? काही वेळ वाट पाहिल्यानंतर बालक म्हणाला, “प्रभू आपण नाही खाणार? ठीक आहे, मी ही काही न खाता-पिता झोपी जातो.”

त्यानंतर मात्र भगवान स्वतःला थांबवू शकले नाहीत, आणि ते आपल्या सिंहासनावरुन उतरुन खाली येऊन बसले आणि दोन्ही हातांनी जेवू लागले. त्यांनी ताटात काहीच उरविले नाही तसेच ते अत्यंत प्रसन्न होते. बालक रिकामी थाळी घेऊन स्वयंपाक घरात परत घेऊन आला आणि आईला म्हणाला, “आई, भगवंताने भोजन केले! खूप त्रास झाला मला त्यांना जेवण भरवतांना.”

बालकाची आई म्हणाली, “त्यांनी खाल्ले, म्हणायचे काय तुला? चपात्या कुठे आहेत? भाजी कुठे आहे?” आईने विचारले. बालक उत्तरले- “त्यांनी खाल्ले.” आईने पुन्हा विचारले- “त्यांनी खाल्ले! कसे काय शक्य आहे?” दुसऱ्या दिवशी बालकाने भगवंताला पुन्हा त्याच प्रकारे भोजन करविले. त्यानंतरच्या दिवशी ब्राह्मण घरी परतला. त्याच्या पत्नीने त्याला सांगितले, “गेल्या दोन रात्रींपासून आम्ही काही न खाता-पिताच झोपतोय.” “का?” ब्राह्मणाने विचारले. “ठाकुरजींना जे काही अर्पण केले गेले, ते सगळे त्यांनी ग्रहण केले.” “ठाकुरजींनी खाल्ले? कसे काय? ब्राह्मणाने विचारले.” थोडा विचार केल्यानंतर ब्राह्मणाने आपल्या पुत्रास बोलावून म्हटले. “माझ्या प्रिय पुत्रा! मला असे वाटते की एखादा उंदीर येऊन सगळा नैवेद्य खात असणार. उंदीर भगवंताच्या जुन्या सिंहासनाखालीच आपले बीळ बनवून तेथे आरामात रहातात. त्यांना भोजनही सहजासहजी मिळते, त्याचबरोबर दीपकातले तूपसुद्धा प्यायला मिळते.” बालक हट्ट करीतच म्हणाले, “नाही! ठाकुरजींनी सगळे जेवण ग्रहण केले.” ब्राह्मण म्हणाला, “ अच्छा अच्छा आज रात्री सुद्धा तूच भोग लाव बरं!”

त्या रात्री जेव्हा बालक भोग लावत होते तेव्हा ब्राह्मण जवळच लपून पहात होता की ठाकुरजी खरोखरीच जेवतात की नाही. बालक म्हणाले, “प्रभो आपण उशीर का करताय? लवकर या आणि नैवेद्य ग्रहण करा.” परंतू ठाकुरजी मात्र आपल्या स्थानावर स्थितप्रज्ञासारखे बसले होते. तेव्हा बालक म्हणाले, “ प्रभो, आपण जेवत का नाही? आपण का लाजताय? असे काय झाले?” तेवढ्यात एक कोमल-मृदु आवाज आला- “आज तुझे पिता लपून बघत आहेत, म्हणून मी येणार नाही.” बालक म्हणाले- “का? आपण अवश्य या आणि भोग ग्रहण करा. जर आपण जेवला नाहीत तर मी दुःखी - कष्टी होईन” ठाकुरजी म्हणाले “जा आणि आपल्या वडिलांना स्पर्श करुन ये.” बालकाने तसेच केले. त्याचवेळी बालकाचे काही भाव पित्यामध्ये प्रकाशित झाले. नंतर ब्राह्मणाने पाहिले की ठाकुरजी खरोखरीच भोग ग्रहण करित आहेत. पूजा करण्यासाठी अशी भावना असणे आवश्यक आहे. जर अशी

भावना आणि श्रद्धा नसेल तर पूजा करण्याचा अधिकार येत नाही. म्हणून कृष्ण म्हणतात-

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः।। (गीता ९/२६)

जो भक्तिपूर्वक मला पत्र, पुष्प, फल आदि प्रदान करतात, मी त्या शुद्धचित्त भक्तांद्वारे भक्तिपूर्वक प्रदत्त त्या समस्त वस्तुंना ग्रहण करतो. अर्जुन म्हणाला- "येथे या युद्धभूमीमध्ये अशा प्रकारचे अर्चन करणे मला संभव होणार नाही. कृपया आपण एखादा साधासरळ उपाय सांगा."

कृष्ण म्हणाले- "जर तुला साधासरळ मार्ग हवा असेल, तर 'मां नमस्कुरु'- मला केवळ प्रणाम कर."

केवळ प्रणाम नाही, नमस्काराचा अर्थ आहे आपल्या अहंकाराचा परित्याग करुन प्रणाम निवेदन करणे. सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणंव्रज! "समस्त धर्मांचा परित्याग करुन केवळ माझ्या शरणी या."

या उपदेशाला हृदयात धारण करुन आपणास कृष्णाला प्रणाम करायला हवा. केवळ मात्र एकदाच अशा प्रकारे प्रणाम करुन आपण एका झेपेतच हा अथांग भवसागर पार करुन जाऊ शकतो. यमराजजी यमदूतांना उपदेश देतात-

जिव्हा न वक्ति भगवद्गुणनामधेयं
चेतश्च न स्मरति तच्चरणारविन्दम्।
कृष्णाय नो नमति यच्छिर एकदापि
तानानयध्वमसतोऽकृतविष्णुकृत्यान्।। (श्रीम. भा. ६/३/२९)

अर्थात्, हे दूतगण! ज्याची जिव्हा कृष्णनामाचे कीर्त्तन करित नाही, ज्याचे चित्त श्रीकृष्णाच्या पादपद्माचे स्मरण नाही करित, ज्याचे मस्त एकदाही श्रीकृष्णास नमन करित नाही, अशा असत् लोकांनाच माझ्याकडे घेऊन या, कारण ते कुठल्याही प्रकारचे भक्तिमय कार्य करित नाहीत.

दशाश्वेधि पुनरेति जन्म कृष्ण प्रणामी न पुनर्भवाय।

"ज्यांनी दहा अश्वमेध यज्ञ केले आहेत, त्यांचा पुनर्जन्म होतो, मात्र ज्यांनी केवळ एकदाच कृष्णास प्रणाम केलाय, त्यांचा पुनर्जन्म होत नाही."

'सकृत प्रणामी कृष्णस्य मातुस्तन्यम् पिवेन्नहि।'

अर्थात्, जो कृष्णाला प्रणाम करतो, त्यास पुन्हा मातेचे स्तनपान करावे लागत नाही.

ज्याने केवळ एकदाच संपूर्ण शरणागतीने कृष्णास प्रणाम केला आहे, तो जन्ममृत्यूच्या चक्रातून मुक्त होतो. तो मातेच्या गर्भात प्रवेश करित नाही. हेच 'मां नमस्कुरु' चे तात्पर्य आहे.

अर्जुन म्हणाला, "प्रभो, मी आपल्याला केवळ एकदाच नाही, तर शत-शत वेळा प्रणाम केला आहे."

या श्लोकात कृष्ण म्हणतात, "मद्भक्तो- माझे भक्त बना. मन्मनाभव आपल्या मन तथा हृदयाला माझ्यात तल्लीन करा, माझ्या भजनी लीन व्हा. त्या भजनानंतर मद्याजी- माझी पूजा करा तथा पूजा केल्यानंतर मला प्रणाम निवेदन करा."

या श्लोकात वर्णिलेल्या चार क्रिया एक होऊन जातात. सखोल श्रद्धा, हार्दिक भावना तथा प्रेमपूर्वक भक्तिच्या सर्व अंगांचे याजन करित भगवान् श्रीकृष्णाला नमस्कार करा. हीच सर्वगुह्यतम संपत्ती, 'परमं वचः' अर्थात् गीतेचा सर्वोपरि उपदेश आहे. जर कुणी केवळ याच श्लोकाचे उत्साहाने आणि गांभीर्याने अनुशीलन केले, तर तो निश्चितच भवसागर पार करुन श्रीकृष्णाच्या चरणकमलांत प्रेम प्राप्त करु शकेल.

या श्लोकात सूत्र रुपाने ब्रजभक्तिच्या प्राप्तिचा उपाय सांगितला गेला आहे, जेथे कृष्णाच्या भगवत्तेचे ईश्वरी ज्ञान ब्रजवासींच्या माधुर्यमयी सेवासागरात निमज्जित होऊन जाते. ब्रजची भक्ती अनुपम आहे, केवळ येथेच श्रीकृष्ण आपल्या भक्तांच्या प्रेमबंधनात बांधले जातात. श्रीमद्भागवतात याचे विस्तृत रुपाने वर्णन केले गेले आहे.

गीता एक प्रारंभिक ग्रंथ आहे तथा आपण या ग्रंथाचा कुठल्याही प्रकारे अनादर करता कामा नये. यातील उपदेश भक्तिरुपी महालाचा सुदृढ पाया निर्माण करतात.

समाप्ति २८.०२.२०१० - रविवार

गौरपौर्णिमा-

माया बनकर (यशोदादेवीदासी)

Translation by: - Maya Sudhakar Bankar (Yashodadevidasi)